## नेमणे आहे
नामवंत दै. ‘जनता आवाज’ वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com


# दैनिक जनता आवाज


साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ११३ | शनिवार, दि. १४ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## संमिश्र

### इम्तियाज जलील यांच्यावर अ‍ॅट्रॉसिटी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**छ. संभाजीनगर :** संजय शिरसाट यांच्यावर औद्योगिक वसाहतीमधील जमिनीवरून आरोप करताना एका समाजाविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याच्या तक्रारीवरून माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यावर क्रांती चौक पोलिस ठाण्यात अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुवारी रात्री लक्ष्मण हिवराळे (४६, रा. क्रांतिनगर) यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

### तेलंगणामध्ये वीज कोसळून ६ जणांचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** देशातील मान्सून २९ मेपासून मुंबई-छत्तीसगड सीमेवर थांबला आहे. दक्षिण आणि ईशान्येकडील राज्ये वगळता सर्व राज्यांमध्ये तीव्र उष्णता जाणवत आहे. आज मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशसह ९ राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. राजस्थान, हरियाणा, पंजाब आणि दिल्लीमध्ये तीव्र उष्णतेचा रेड अलर्ट आहे. येथील तापमान ४५ अंशांपेक्षा जास्त जाऊ शकते. त्याच वेळी, हरियाणाच्या ९ जिल्ह्यांमध्ये दिवसाचे तापमान ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकते.

### कोल्हापुरात शाळकरी मुलगा गेला वाहून

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे. कोल्हापुरात ढगफुटीसदृश पाऊस झाला आहे. गुरुवारी सायंकाळच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसाने कोल्हापूर शहर तसेच ग्रामीण भागाला झोडपून काढले. अनेक भागात पाणी साचले आहे. अनेकांच्या घरात देखील पाणी शिरल्याची माहिती समोर आली आहे. हवामान विभागाने संपूर्ण महाराष्ट्रात ऑरेंज अलर्ट जारी केले आहे.

### नवी मुंबईतील कंपनीत गॅस गळती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** नवी मुंबईतील एका कंपनीमध्ये गॅस गळतीची घटना घडली आहे. कार्बन मोनॉक्साईडच्या गळतीमुळे कंपनीतील तब्बल २५ महिला कामगार बेशुद्ध झाल्या असून, एकूण २७ जणांवर या विषारी वायूचा परिणाम झाला आहे. सर्व बाधितांना तात्काळ उपचारासाठी वाशी येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.




## मोदींनी घेतला परिस्थितीचा आढावा; जखमींची घेतली भेट

# पंतप्रधान मोदींकडून दुर्घटनास्थळाची पाहणी

जनता आवाज वृत्तसेवा

**अहमदाबाद : पंतप्रधान नरेंद्र मोदी काल शुक्रवारी अहमदाबादला दाखल होत त्यांनी एअर इंडिया विमानाच्या अपघातग्रस्त ठिकाणी पोहोचले. पंतप्रधानांनी परिस्थितीचा आढावा घेतला यासह दुर्घटनास्थळाची पाहणी केली आणि नंतर जखमींची भेट घेतली. अहमदाबाद आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडनला जाणारे विमान गुरुवारी अचानक कोसळले. या भीषण अपघातात २६५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.**

पंतप्रधान मोदी काल सरदार वल्लभभाई पटेल विमानतळावर दाखल झालेत आणि तेथून ते थेट मेघानी नगर परिसरातील अपघातस्थळी गेले. मेघानी नगर हा तोच निवासी परिसर होता जिथे हे विमान कोसळले आणि मोठी दुर्घटना घडली. पंतप्रधान मोदींचा ताफा प्रथम घटनास्थळी पोहोचला. जिथे पंतप्रधान मोदींनी परिस्थितीचा आढावा घेतला.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर मोदींनी अपघाताबद्दल सर्व माहिती गोळा केली. दुर्घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर, पंतप्रधान मोदी जखमींना भेटण्यासाठी रुग्णालयात रवाना झाले. यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल देखील पंतप्रधानांसोबत उपस्थित होते.

सरकारने बोईंग कंपनीच्या विमानासंदर्भाने मोठा निर्णय घेतला आहे. एअर इंडियाकडून तपासणीसंदर्भातला रिपोर्ट डीजीसीएला सुपूर्द करावा लागणार आहे. डीजीसीएने एअर इंडियाला लिहिलेल्या पत्रात एअर इंडियाच्या देखभाल आणि तपासणी प्रक्रियेबद्दलही प्रश्न उपस्थित झाले आहेत. अहमदाबाद विमान अपघाताच्या तपासात आता एटीएसचीही एंट्री झाली आहे.



### मोदींकडून बचावलेल्या प्रवाशाची विचारपूस

अहमदाबाद विमानतळाजवळ एअर इंडियाच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या अपघातात प्रवासी, केबिन क्रू आणि मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलमधील डॉक्टरांचा मृत्यू झाला. जवळपास २६५ जणांचा यात मृत्यू झाला. तर, एक जण बचावला आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी या अपघातात बचावलेल्या एका प्रवाशाची विचारपूस केली.

### ‘ते’ डिएफडीआर नाही

अहमदाबादमध्ये विमान अपघातानंतर विमानाचा ब्लॅक बॉक्स घटनास्थळाच्या इमारतींवर सापडला आहे. या संदर्भात संबंधित तपास यंत्रणा काम करत असून ४० हून अधिक राज्य सरकारचे तपास अधिकारी आणि विमान वाहतूक मंत्रालयाचे अधिकारी अपघात भागात तपास करत आहेत. ब्लॉक बॉक्स संदर्भात जे सोशल मीडियावर व्हिडीओ रेकॉर्डर व्हायरल होत आहे. ते डिएफडीआर नाही असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

तर, बोईंग विमानाच्या संदर्भातने केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एअर इंडिया विमान दुर्घटनेनंतर नागरी विमान पान ४

## ... अखेर रुपेश भन्साळींना जामीन मंजूर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर अर्बन बँक घोटाळा प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने अटक केलेल्या पुण्यातील बांधकाम व्यावसायिक रुपेश सूर्यकांत भन्साळी यांना बुधवारी विशेष न्यायाधीश एम. एच. शेख यांनी जामीन मंजूर केला आहे.




याप्रकरणी सुनावणी करताना न्यायाधीश एम. एच. शेख यांनी आदेश देताना ऑर्डरमध्ये नमूद केले आहे कि, आरोपीला अटक केलेल्या पोलिस अधिकाऱ्यांनी आरोपीस २४ तासाच्या आत न्यायालयात हजर करणे आवश्यक होते. पण त्यासाठी ३० तास एव्हढा अवधी घेतला. त्यामुळे अर्जदाराची अटक बेकायदेशीर आहे आणि कायद्याच्या आदेशाविरुद्ध आहे. हे भारतीय संविधानाच्या कलम २२ (२) चे उल्लंघन आहे.

अर्जदाराला २४ तासांच्या निर्धारित कालावधीत जवळच्या दंडाधिकाऱ्यांसमोर हजर न करता कोठडीत ठेवणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे आणि ते भारतीय संविधानाच्या कलम २२ (२) अंतर्गत मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. असे ताशेरे न्यायाधीश एम. एच. शेख यांनी सुनावणी दरम्यान पोलिसांवर ओढले आहेत.

२४ तासांच्या बेकायदेशीर कोठडीनंतर अर्जदाराची अटक नष्ट होते. हे भारतीय संविधानाच्या कलम २२ (२) अंतर्गत आरोपीच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. त्यामुळे आरोपीला जामिनावर सोडणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. म्हणूनच अर्जदार जामिनासाठी पात्र आहे, अशी आदेश देत रुपेश भन्साळी यांना जामीन मंजूर केला आहे.

यावेळी आरोपी रुपेश भन्साळी यांच्या वतीने ॲड. पृथ्वीराज डापसे व ॲड. सेऊल शहा यांनी युक्तिवाद केले. त्यांना ॲड. मुस्कान सय्यद, ॲड. श्रीकांत ताके व तेजस कोल्हे यांनी सहकार्य केले.

## ... आता निवडणूक प्रक्रियेला गती मिळणार

### जिल्हा परिषदेचा प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्यातील जिल्हा परिषद निवडणुका गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ रखडल्या होत्या. या निवडणुकांसाठी अखेर प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ग्रामविकास विभागाने यासंदर्भात पावले उचलली आहेत. ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी प्रभाग रचनेचे आदेश जारी केले आहेत. यामुळे नगरसह राज्यातील इतर



जिल्ह्यांमध्ये निवडणूक प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे.

ग्रामविकास विभागाने दिलेल्या निर्देशानुसार १४ जुलै २०२५ पर्यंत जिल्हाधिकारी प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिद्ध करणार आहेत. त्यावर हरकती व सूचना सादर करण्यासाठी २१ जुलै पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. आलेल्या हरकती आणि त्यावरील अभिप्राय विभागीय आयुक्तांना सादर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना २८ जुलै पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे.

प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेऊन निर्णय देण्याचा अधिकार विभागीय आयुक्तांना असून त्यासाठी विभागीय आयुक्तांना १९ ऑगस्ट २०२५ पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. त्यानंतर अंतिम प्रभाग रचना मान्यतेसाठी राज्य निवडणूक पान ४

## कौशल्य आधारित शिक्षण गरजेचे : मा. मंत्री थोरात



पारंपारिक शिक्षणापेक्षा कौशल्य आधारित शिक्षण देण्यावर आणि विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार शिक्षण देण्यावर शिक्षणतज्ज्ञ वांगचुक यांनी भर दिला आहे. या ठिकाणाहून अनेक शास्त्रज्ञ निर्माण झाले आहे. याचबरोबर लडाखसारख्या दुर्गम प्रदेशांमध्ये वांगचुक यांनी मोठी शैक्षणिक क्रांती घडवली असून त्यांनी विद्यार्थ्यांना निसर्गाशी व आनंददायी शिक्षणाची जोडले आहे.

**- बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** आमिर खान यांचा गाजलेला थ्री इडियट चित्रपट हा तरुणांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरला होता. या चित्रपटातील खरेखुरे शिक्षण तज्ज्ञ असलेले फुंगसुक वांगडू यांनी काश्मीर खोऱ्यातील दुर्गम भागामध्ये विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित ज्ञान देण्याची शाळा सुरू केली असून जगभरात कौतुकास्पद ठरलेल्या या पर्यावरणप्रेमी व शिक्षणतज्ज्ञांची महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांनी भेट घेतली असून आगामी पिढीला कौशल्य आधारित ज्ञान गरजेचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

काश्मीर खोऱ्यातील लडाखच्या दुर्गम प्रदेशात अभियंते तथा थोर शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक तथा फुंगसुक वांगडू यांची माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी समवेत अमृतवाहिनी शिक्षण संस्थेच्या विश्वस्त शरयू देशमुख उपस्थित होत्या.

शिक्षणातील करियर हे आपल्या आवडीनुसार करावे किंवा तरुणांना आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये पान ४

## शनैश्वर देवस्थानने १६७ कर्मचाऱ्यांना हटवले

### शनिशिंगणापूर देवस्थानचा मोठा निर्णय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** शनैश्वर देवस्थानमध्ये कार्यरत असलेले १६७ कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले आहे. काढून टाकण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांचा समावेश होता. अनियमितता आणि शिस्तीचे पालन न केल्याच्या कारणावरुन कर्मचाऱ्यांना काढण्यात आले आहे.



### झालेली कारवाई योग्य : सागर बेग

गेल्या काही दिवसांपूर्वी कोल्हार येथील मुस्लिमांची मजार काढण्यावरून मोर्चा काढण्यात येणार होता. त्या अगोदरच तेथील मजार काढण्यात आली. तसाच प्रकार शनिशिंगणापूर देवस्थान संदर्भात घडला आहे. हिंदू समाजाला अशा प्रकारचे मोर्चे करावे लागतात, ही शरमेची बाब आहे. शनैश्वर देवस्थानने केलेली कारवाई योग्य असल्याचे सागर बेग यांनी सांगितले.

शनिशिंगणापूर देवस्थानने हा मोठा निर्णय घेतला आहे. गेल्या काही दिवसांपासून मुस्लिम कर्मचाऱ्यांना काढण्याबाबत हिंदू संघटनांनी दबाव आणला होता. शनिदेवाच्या चौथ्याऱ्यावर मुस्लिम लोकांच्या हाताने काम करुन घेतल्यामुळे सकल हिंदू समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते.

श्री क्षेत्र शनिशिंगणापूर मंदिरात मुस्लिम कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवरुन वाद वाढला होता. शनिशिंगणापूर मंदिर ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांविरुद्ध हिंदू संघटना आक्रमक झाल्या आहेत.

ट्रस्टने सर्व मुस्लिम कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावरुन काढून टाकावे, अशी संघटनेची मागणी होती. अन्यथा १४ जून रोजी मंदिराबाहेर संपूर्ण पान ४

मुस्लिम कर्मचारी कमी करावे, अशी आमची आग्रही मागणी होती. त्यानुसार सकल हिंदू समाजाच्या वतीने आंदोलन आम्ही करणार आहोत. अजून आम्हांला देवस्थानचे लेखी उत्तर मिळाले नाही. शिंगणापूर देवस्थानला हे उशिरा सुचलेले शहाणपण असून बनावट ॲप संदर्भात लवकर कारवाई झाली नाही, तर तीव्र आंदोलन आम्ही करणार आहोत.

**- ऋषिकेश शेटे, भाजप नेते**

## कुजलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह

### तरूणाची पटली ओळख; जामखेड पोलीसांत गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड शहरातील करमाळा रोडवरील नवीन न्यायालयाकडे जाणाऱ्या शेताजवळील विहीरीत आरिफ इसाक शेख (वय ३९, रा. सदाफुले वस्ती, जामखेड) या तरुणाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. पोलिसांनी यांची ओळख पटवून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला आहे.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, काल दि. १३ जुन रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास जामखेड येथे करमाळा रोडकडील नवीन न्यायालयाकडे जाणाऱ्या बाजुच्या शंकर भाऊसाहेब कोल्हे शेत गट नं १५७ मधील शेतातील विहीरीमध्ये एका तरुणाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला.

हा मृतदेह शेताच्या मालकास विहिरीत दिसून आल्यानंतर ही घटना लक्षात आली. विहिरीत पडलेल्या मृतदेहाला बरेच दिवस झाल्याने तो कुजलेल्या अवस्थेत होता. जामखेड पोलिस त्या ठिकाणी आल्यावर इतरांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला. मयताच्या खिशात त्याचे आधारकार्ड आढळून आल्यानंतर त्याची ओळख पटली असून आरिफ शेख असे त्याचे नाव आहे. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्याने घटनास्थळीच त्याच्यावर शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

घटनास्थळी मृतदेह वर काढण्यासाठी जामखेड पोलीस स्टेशनचे पो. ना. जितेंद्र सरोदे, पो. कॉ. जी. डी काळाने व पो. कॉ. प्रकाश मांडगे यांनी मदत करुन घटनास्थळी मृतदेहाचा पंचामाना केला. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ना. जितेंद्र सरोदे हे करत आहेत.

## नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा

### आ. विक्रमसिंह पाचपुतेंच्या अधिकाऱ्यांना सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात बुधवार (दि.११) रोजी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसह सर्वांचे तत्काळ पंचनामे करण्याच्या सूचना आ. विक्रमसिंह पाचपुते यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

बुधवारी सायंकाळी संपूर्ण तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे विविध भागात शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचे नुकसान झाले आहे.

कांद्याच्या वखारी वरील पत्रे उडाल्याने काही भागात कांदा



आपत्तीग्रस्त परिस्थितीत सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहे. तसेच नुकसान झालेले शेतकरी व नागरिकांना लवकरच मदत मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

**- विक्रमसिंह पाचपुते, आमदार**

भिजला आहे. तसेच घरावरील पत्रे, पडवी, जनावरांच्या गोठ्यावरील पत्रे उडाल्याने दुग्ध व्यवसायिकांचेही नुकसान झाले आहे. सर्वसामान्य नागरिकांनाही वादळी वाऱ्याच्या पावसाचा फटका बसला आहे. विजेचे पोल व विद्युत तारा तुटल्याने संपूर्ण तालुक्यातील वीज गायब झाली आहे. पान ४

## विखेंचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रसिध्दी पत्रकाद्वारे माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** अहमदाबाद येथे घडलेल्या विमान अपघाताच्या दुर्देवी घटनेच्या पार्श्वभूमीवर जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला असून, कार्यकर्त्यांनी जाहीर कार्यक्रम, सत्काराचे नियोजन न करण्याचे आवाहन केले आहे.

यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात मंत्री विखे पाटील यांनी म्हणले आहे की, अहमदाबाद येथील विमान अपघाताच्या घटनेत भाजपाचे जेष्ठ नेते आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्यासह २६५ प्रवाशांच्या मृत्यूची घटना अत्यंत वेदनादायी आहे.

यामध्ये महाराष्ट्रातील दहा व्यक्तींचा समावेश असून, कधीही भरून न येणारी



हानी असल्याने संपूर्ण देश या घटनेने हादरला आहे.

घटनेतील सर्व मृत नागरीकांना भावपूर्ण श्रद्धांजली आणि त्यांच्या कुटुंबियांप्रति सर्वांच्या संवेदना आहेतच. या कठीण संकटातून सर्व कुटूबियांना सावरण्याची शक्ती परमेश्वराने द्यावी, ही प्रार्थना आहेच.

अशा सर्व परीस्थितीत कोणतेही सार्वजनिक तसेच सत्कार सोहळे आयोजित करणे उचित होणार नाही. त्यामुळे आपण वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला असून, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी सत्काराचे कोणतेही साहीत्य घेवून येवू नये, असे आवाहन पालकमंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

सामाजिक दायित्व म्हणून समाजातील गरजू, निराधार एकल महिलांना मदत तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहीत्य वाटप करावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपक्रमाला पाठबळ म्हणून प्रत्येक गावात, वाड्या वस्त्यांवर वृक्ष संर्वधानची चळवळ म्हणून ‘एक पेड माँ के नाम’ उपक्रम राबविण्याचे मंत्री विखे पाटील यांनी सूचित केले आहे.

# ज्ञानेश्वरी दिंडी सोहळ्यासाठी नेवासकर सरसावले

## पहिल्याच वर्षी सुमारे २५ ते ३० दिंड्या सहभागी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** ज्ञानेश्वराची कर्मभूमी ज्ञानेश्वरी लिखाणस्थान असलेल्या नेवासा शहरातून ऐतिहासिक ज्ञानेश्वरी पालखी सोहळा यावर्षीपासून सुरू होत आहे. या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहरात भक्तीमय उत्साहाचे वारे पसरले आहेत. ऐतिहासिक सोहळ्याचा भाग होण्यासाठी नेवासकर नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला.

ज्ञानेश्वर मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, देविदास महाराज मस्के व विश्वस्त मंडळाने यावर्षी पुढाकार घेतल्याने नेवासातून ऐतिहासिक दिंडी सोहळा सुरू होत आहे. देहू, आळंदी, त्र्यंबकेश्वर या देवस्थानाच्या धरतीवर हा सोहळा सुरू होत असल्याने त्याच धर्तीवर या सोहळ्यामध्ये पहिल्याच वर्षी सुमारे २५ ते ३० दिंड्या सहभागी होत आहेत. सर्व दिंड्यांचे प्रस्थान १९ जून रोजी दुपारी तीन वाजता होत असून या दिंड्यांच्या पहिले रिंगण सोहळा हा नेवासा बस स्थानकामध्ये प्रचंड उत्साहामध्ये होत आहे विश्वस्त कैलास जाधव यांनी सूत्रसंचालन केले यावेळी सर्व विश्वस्त आवर्जून हजर होते.

### आराध्य मंगलकार्यालयात होणार मुक्काम

विशेष म्हणजे पालखी प्रस्थानचे पहिल्या दिवशीचा मुक्काम हा नेवासा शहराबाहेर असलेल्या आराध्या मंगल कार्यालय मध्ये आहे या ठिकाणी सुमारे वीस ते पंचवीस हजार वारकऱ्यांचे पहिले मानाचे अन्नदान नेवासा शहर आणि नेवासा बुद्रुक या दोन शहरांम धून लोकवर्गणीद्वारे केले जाणार आहे. यामध्ये सर्व धर्मीय आणि सर्वपक्षीय नागरिकांनी मोठ्या उत्साहामध्ये भाग घेतलेला आहे, हा ऐतिहासिक सोहळा वारकरी परंपरेत नवा अध्याय ठरणार आहे, असा विश्वास स्थानिक भाविक व्यक्त करत आहेत.

ज्ञानेश्वर मंदिरामध्ये नेवासा खुर्द नेवासा बुद्रुक व पंचक्रोशी तीर नागरिकांचे बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीमध्ये संस्थांचे अध्यक्ष पांडुरंग अभंग आणि विश्वस्त देविदास महाराज मस्के यांनी सर्वांना या सोहळ्यामध्ये सक्रिय उतरण्याचे



आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत सर्वच वक्त्यांनी हा काय आपले आर्थिक योगदान जाहीर केले तसेच या सोहळ्यासाठी विविध उपक्रम कसे कसे राबवले जातील, हेही सांगितलं आणि सोहळा आदर्श तसेच ऐतिहासिक यासाठी सर्वजण संस्थांनाच्या बरोबर असल्याचे देखील सर्वच वक्त्यांनी जाहीर केले. नेवासा पोलीस स्टेशनचे प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे यांनी व्यवस्थापनाविषयी यावेळी मार्गदर्शन केले. १९ तारखेला दुपारी तीन वाजता सदरच्या दिंड्यांचे प्रस्थान होत असून नेवासा शहरातून या दिंड्यां ची नगर प्रदक्षिणा मार्गक्रमण होत असताना नेवासातील गावकऱ्यांनी ठिकठिकाणी स्वागत कमानी उभारणे, दिंडी मार्गावर साड्या, रांगोळी तसेच आलेल्या दिंडीवर पुष्पवृष्टी करणे असे विविध संकल्प केलेले आहेत.

---

# अळिंबी उत्पादनास प्रोत्साहन दिले पाहिजे

## डॉ. सुधाकर पांडे; पुणे येथे वार्षिक बैठकीचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** अन्नधान्य उत्पादनात भारताचे वर्चस्व आहे. यामध्ये पौष्टिक अन्न सुरक्षा ही महत्त्वाची आहे. त्या दृष्टीने अळिंबीचे पौष्टिक मूल्य, औषधी गुणधर्म तसेच अळिंबी उत्पादनास लागणारे कमी पाणी, अल्प खर्चिक प्रक्रिया व मूल्यवर्धन तंत्रज्ञानाचा विचार करता अळिंबी उत्पादनास प्रोत्साहन दिले पाहिजे. यासाठी अळिंबीचा आपल्या आहारामध्ये सुपरफुड म्हणून समावेश होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या उद्यानविद्या विभागाचे सहाय्यक महासंचालक डॉ. सुधाकर पांडे यांनी केले.

,यावेळी डॉ. के. व्ही. प्रसाद यांनी आपल्या मार्गदर्शनात अळिंबीचे आपल्या आहारात प्रमाण वाढवणे गरजेचे असल्याचे नमूद केले. डॉ. वेदप्रकाश शर्मा यांनी भारतामध्ये कार्यरत विविध अळिंबी संशोधन प्रकल्पांच्या कार्याचा आढावा घेऊन प्रगती अहवाल सादर केला. याप्रसंगी उत्कृष्ट अळिंबी संशोधनकार्यासाठी इंदिरा गांधी कृषि विश्वविद्यालय रायपूर तसेच उत्कृष्ट विस्तार कार्याबद्दल डॉ. राजेंद्र प्रसाद केंद्रीय कृषि विश्वविद्यालय, समस्तीपुर या प्रकल्पांना सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कृषि महाविद्यालय, पुणे येथे अखिल भारतीय समन्वित अळिंबी संशोधन प्रकल्पांतर्गत २७ व्या वार्षिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुधाकर पांडे बोलत होते. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी भारतीय कृषि अनुसंधान



परिषदेच्या पुष्प विज्ञान अनुसंधान प्रकल्पाचे संचालक डॉ. के. व्ही. प्रसाद, परस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की अळिंबी उत्पादनास लागणारी मर्यादित संसाधने व कमी गुंतवणूक यामुळे ग्रामीण तसेच अर्ध शहरी भागातील शेतकऱ्यांसाठी अळिंबी उत्पादन रोजगार निर्मिती व उत्पन्न वाढीसाठी उत्तम संधी आहे. अळिंबी उत्पादन तंत्रज्ञानाची सेंद्रिय शाश्वत शेती सोबत सांगड घालून प्रभावी व पर्यावरण पूरक नियंत्रण उपाययोजनांसाठी अधिकचे संशोधन होणे गरजेचे आहे.

---

# खंडोबा देवस्थानवर विश्वस्तांची निवड व्हावी

## मानकरी, भाविक भक्त, ग्रामस्थ यांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्यस्तरीय ब वर्ग तीर्थक्षेत्र असलेले श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान पिंपळगावरोठा, तालुका पारनेर या देवस्थानच्या रिक्त झालेल्या एका विश्वस्त पदावर विश्वस्त मंडळाकडून पारदर्शक व न्याय पद्धतीने नवीन विश्वस्ताची निवड करण्याची मागणी देवस्थानचे मानकरी, भाविक भक्त, ग्रामस्थ व देणगीदार यांचेकडून करण्यात आली आहे.



यासंबंधीचे लेखी निवेदन देवस्थान विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी व मा. धर्मादाय उपायुक्त अहिल्यानगर यांना खंडोबा भक्त गोरख जगताप, बेल्हा काठीचे मानकरी संकल्प विश्वासराव (मूळ मंदिर निर्माण करणाऱ्यांचे वारस), ग्रामस्थ गोपीनाथ घुले, भाऊसाहेब घुले यांनी पाठविले आहे.

श्री कोरठण खंडोबा देवस्थानचे विद्यमान १५ विश्वस्तांपैकी विश्वस्त राजेंद्र चौधरी यांचे निधन झाल्याने सदरचे विश्वस्त पद जागा रिक्त झालेली आहे. सदर रिक्त विश्वस्त जागेवर नवीन विश्वस्त निवड करण्याची प्रक्रिया विश्वस्त मंडळाकडून होणार असल्याने सदरची निवड प्रक्रिया पारदर्शक व न्याय पद्धतीने तसेच योग्य गुणवत्तेवर व पात्रतेवर नवीन विश्वस्ताची निवड करावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे. दर पाच वर्षांनी देवस्थानच्या विश्वस्त मंडळाची निवड धर्मादाय उपायुक्त कडून न्याय प्रक्रियेद्वारे केली जाते. त्याचप्रमाणे विश्वस्त पदाच्या रिक्त झालेल्या जागेवर नवीन विश्वस्त निवड करण्याचा कार्यक्रम विश्वस्त मंडळाने वर्तम ानपत्रात सविस्तर जाहिरात देऊन विश्वस्त पदासाठी अर्जाचा नमुना, प्रतिज्ञापत्र, पोलीस व्हीरिफिकेशन व आवश्यक कागदपत्र याची माहिती प्रसिद्ध करून इच्छुकांचे अर्ज मागविण्यात यावेत.

---

# मुंबईचा संघ ठरला आमदार चषकाचा मानकरी

## पारगावचा संघ द्वितीय, मंचरचा संघ तृतीय तर मालदाड, घुलेवाडी संघ चतुर्थ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी आणि मालदाड पंचक्रोशीतील तरुणांनी आयो जित केलेल्या आमदार चषक २०२५ राज्यस्तरीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत देशमुख एंटरप्राइजेस, यांच्या मार्फत आलेला मुंबई येथील घोटेकर बी हा संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. तर द्वितीय क्रमांक अभी दादा भांडले (पारगाव) या संघाने, तृतीय क्रम ांक एस के वॉरियर्स मंचर तर चतुर्थ क्रमांक छत्रपती वॉरियर्स मालदाड घुलेवाडी या क्रिकेट संघाने पटकविले.

संगमनेर तालुक्यातील मालदाड येथील कानिफनाथ क्रीडांगणावर ७ ते ११ जून या कालावधीत आमदार चषक २०२५ टेनिसबॉल क्रिकेट



स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या क्रिकेट स्पर्धे साठी संपूर्ण राज्यातून १६ संघ सहभागी झाले होते. सागर वर्पे, सुदर्शन देशमुख, सुधीर वाळे, राहुल राऊत, नवनाथ पानसरे जवळे कडलग आणि चिकणी यांनी आणलेला मुंबई येथील बी. घोटेकर या क्रिकेट संघाला प्रथम क्रमांकाचे आ. अमोल खताळ युवा मंचच्या वतीने एक लाख रुपये रोख व डीलक्स मोटर सायकल देऊन गौरव करण्यात आला.

द्वितीय क्रमांकाच्या संघाला गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर स्वरूप राऊत यांच्या वतीने ७१ हजार रुपये रोख व इलेक्ट्रिक बाइक, तृतीय क्रमांकाच्या संघाला भाजपचे निमोणचे सरपंच संदीप देशमुख व गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर तसेच शिवसेनेचे सौरभ देशमुख यांच्या वतीने ५१ हजार रुपये रोख व स्पोर्ट सायकल तर चतुर्थ क्रमांकाचे बक्षीस गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर अनिल गोर्डे यांच्या कडून ३१ हजार रुपये रोख एलईडी टीव्ही असे बक्षिसे देण्यात आली. आमदार अमोल खताळ आणि इतर मान्यवरांच्या हस्ते चार ही संघांना करंडक देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी निमोण सरपंच आणि भाजप उपाध्यक्ष संदीप देशमुख घुलेवाडी शिवसेना शाखा प्रमुख शरद पानसरे विलास राउत गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर अनिल गोर्डे, उपस्थित होते.

---

# आ. काळेंच्या दूरदृष्टीतून पश्चिम भागही होणार समृद्ध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** आ. आशुतोष काळे यांनी रस्ते व पुलांच्या कामांसाठी मतदार संघातील रस्त्यांसाठी पहिल्याच पंचवार्षिकमध्ये जवळपास सातशे कोटीपेक्षा जास्त निधी आणल्यामुळे बहुतांश रस्त्यांचे भाग्य उजळले आहे. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास सुखकर तर झालाच परंतु त्याचबरोबर दळणवळणाला देखील मोठ्या प्रमाणात चालना मिळाली आहे. अशातच अजून एका महत्वाच्या रस्त्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. त्यामुळे मतदार संघातील इतर भागाबरोबरच कोपरगाव तालुक्याचा पश्चिम भाग देखील रस्त्याच्या बाबतीत लवकरच कायमस्वरूपी समृद्ध होणार असल्याचे कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे संचालक सचिन चांदगुडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.



ज्याप्रमाणे १९१ कोटी निधीतून ७५२ जी या राष्ट्रीय महाम ार्गाच्या सावळीविहीर-कोपरगाव या रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्याप्रमाणेच २३२ कोटी निधीतून राज्य मार्ग ७ वरील देर्डे फाटा ते भरवस फाटा या रस्त्याचे काम देखील युद्ध पातळीवर सुरु झाले आहे.

मतदार संघाच्या विकासासाठी निधी कसा मिळवायचा आणि त्यासाठी पाठपुरावा कसा करायचा? हे कसब आ. काळे यांनी पहिल्याच पंचवार्षिकमध्ये योग्य प्रकारे अवगत करून कधी एका रस्त्याला १९१ कोटी तर दुसऱ्या रस्त्याला २३२ कोटी निधी अथक प्रयत्नातून त्यांनी मिळविला आहे. ज्या रस्त्यांची कामे पूर्ण होतील, अशी अपेक्षाच मतदार संघातील जनतेने सोडली होती, अशा रस्त्यांसाठी सुद्धा त्यांनी शेकडो कोटी निधी आणला आहे. यामध्ये कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असणारा पश्चिम भागातील दक्षिण-उत्तर असलेला राज्य मार्ग ७ वरील देर्डे फाटा ते भरवस फाटा तालुका हद्द या रस्त्याचा समावेश आहे.

---

# कडू यांच्या आंदोलनास दिव्यांगाचा पाठिंबा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** सत्ताधारी पुढाऱ्यांनी निवडणूकीच्या अगोदर शेतकऱ्याचा उतारा कोरा करु, दिव्यांगांना सहा हजार रुपये पेन्शन देऊ' अशा अनेक घोषणा करून शेतकरी व दिव्यांगांची मते मिळवली. मात्र सत्तेत आल्यानंतर त्यांना दिलेल्या आश्वासनांचा विसर पडला. आज बच्चूभाऊ कडू यांनी अनेक मागण्यांसाठी उपोषण सुरु केले. त्यांना पाठिंबा म्हणून आम्ही प्रशासनाला निवेदन देत आहोत, असे प्रहार दिव्यांग क्रांती संघटनचे जिल्हाध्यक्ष म धुकर घाडगे यांनी व्यक्त केले.

### तर कठोर आंदोलन करणार

जर सरकारने मागण्या मान्य केल्या नाही तर आमची अंत यात्रेची तयारी करा. बच्चुभाऊंची आर्त हाक सरकार पर्यंत पोहोचवावी. अन्यथा पूर्ण महाराष्ट्रभरात वेगवेगळ्या पद्धतीचे आंदोलन सुरू होतील. १४ तारखेच्या आत सरकारने मध्यस्थी करावी आणि दिव्यांगांना सहा हजार रुपये पेन्शन द्यावी, शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, शेत मालाला हमीभाव द्यावा, अशा विविध १७ मागण्या मान्य करून त्याची अंम लबजावणी करावी. असे निवेदनात म्हटले आहे.

प्रहार दिव्यांग क्रांती संघटनच्या वतीने तहसीलदार नामदेव पाटील व पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना निवेदन देण्यात आले. त्यात म्हटले आहे कि, दिव्यांग बांधवांचे व शेतकऱ्यांचे दैवत बच्चूभाऊ



कडू हे ८ जून पासून मोझरी जिल्हा अमरावती या ठिकाणी अन्नत्याग आंदोलन करीत आहेत. आज ६ दिवस झाले आहे. गेंड्याच्या कातड्याच्या सरकारने कोणतीही दखल घेतली नाही. ते आपल्या १७ मागण्यावर ठाम आहेत.

---

# शेवगाव तहसील कार्यालयावर हेलगा आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी, या मागणीसाठी प्रहार चे संस्थापक अध्यक्ष मा आम दार बच्चू कडू हे अमरावती मधील माझोरी येथील संत गाडगेबाबा समाधी जवळ ते उपोषणास बसले आहेत.



**प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांना पाठिंबा**

या आंदोलनास पाठिंबा म्हणून शेवगाव तालुक्यातील प्रहार संघटनेचे अध्यक्ष राम शिदोरे यांच्या मार्गदर्शनाखाली काल शेवगाव तहसील कार्यालयावर म्हशीचे हेलगे आणून अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी हेलग्याच्या पाठीवर फडणवीस सरकारचा जाहीर निषेध असे लिहिले गेले होते. यावेळी शेवगावचे प्रभारी तहसीलदार दीपक कारखिले यांनी निवेदन स्वीकारले. तहसील कार्यालयात हेलगा शिरल्यानंतर कार्यालयामध्ये एकच गोंधळ उडाला.

यावेळी प्रहार संघटनेचे शेवगाव तालुका अध्यक्ष राम शिदोरे, महिला तालुका अध्यक्ष लक्ष्मी देशमुख, वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा किसान चव्हाण, उद्धव बाळासाहेब शिवसेना गटाचे तालुका प्रमुख अविनाश मगरे, वंचित बहुजन पार्टीचे तालुका अध्यक्ष शेख प्यारेलाल, भायगाव गावचे सरपंच राजू आढाव, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मच्छिंद्र आर्ले, बाळासाहेब धोंडे, आप्पासाहेब जगदाळे, भाऊसाहेब शिरसाठ, राहू कोळी, वामन सौदागर, लहू भवर, बाबा मिय्या सय्यद, किशोर पवार, सिताराम शिंदे, अविनाश देशमुख सह इतर कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

---

# शहरातील ओढे नाल्यांची १०० टक्के साफसफाई पूर्ण

## वेळेत साफसफाई झाल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यास मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महानगर पालिकेच्या यंत्रणेकडून शहरातील विविध ओढे नाल्यांच्या साफसफाईचे काम महानगरपालिकेकडून १०० टक्के पूर्ण करण्यात आले आहे. ओढे व नाल्यातून पाण्याचा प्रवाह अडणार नाही, या दृष्टीने आवश्यकतेनुसार पात्राची सफाई करून गाळ व इतर कचरा काढण्यात आला आहे. त्यामुळे शहरात साचणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी मदत झाली आहे. तसेच, सीना नदी पात्रात आवश्यक ठिकाणी साफसफाई करण्यात आली आहे. नदीच्या काही भागात सफाईचे काम सुरू असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

महानगरपालिकेने एप्रिल महिन्यापासून नालेसफाईचे काम हाती घेतले होते. प्रमुख ओढे व नाल्यांची साफसफाई ९ जून पर्यंत पूर्ण करण्यात आली आहे. यात सनी पॅलेस मागील बाजू - सुर्यानगर (पुल) - तवलेनगर मागील बाजु ते निर्मलनगर ते भगवान बाबा चौक पर्यंत, भगवान बाबा मंदिर - शिरसाठ मळा शेती मधुन - बालाजी कॉलनी पर्यंत, साई इंग्लीश स्कुल शेजारील शिव

शहरातील काही भागात पावसाचे पाणी सखल भागात साचत आहे. या भागात पाहणी करून तेथील बंदिस्त झालेल्या पावसाळी गटारीच्या माध्यमातून या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. बांधकाम विभाग व इतर विभागांना याबाबत पाहणी करून पाण्याचा निचरा होण्यासाठी तत्काळ नियोजन करून उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आल्याचेही आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.



चिदंबर मंदिर पासुन गावडेमळा पुल ते ध्यान मंदिर ते कादंबरी नगरी पुल, किसनगीरी नगर ते पिचींग नालापर्यंत - नाल्यापासुन पुढे गजराज फॅक्टरी जवळील पुल - रस्ता ओलांडून गजराज फॅक्टरी ते जाधवमळा, पाईपलाईन रोड डी मार्ट समोरील पुल ते मनमाड रोड ते अर्जुन वॉशिंग ते फुलारी यांच्या शेतापर्यंत, मंगल हौसिंग सोसायटी ते बारा ईमाम ट्रस्ट जागा ते कृष्ठधाम रोड पर्यंत, अमोल विहार जवळील नाला + रासनेनगर पुल - कैलास हौसिंग सोसायटी - मनमाडरोड (पंचशील हॉटेल जवळील पुल), डीझायनर सोसायटी - प्रभाग बेकरी मागून एलटी गेस्ट हाऊस ते कैलास हौसिंग सोसायटी, बालिकाश्रमरोड - न्युक्लिअस हॉस्पीटल समोर - वाकळेमळा ते नामदेव मंदिरमागे - ताठेनगर आदी ठिकाणी नालेसफाई पूर्ण करण्यात आली आहे.

## संपादकीय

# अपघाताचे मूळ शोधताना...

अवघ्या देशाला सुन्न करणाऱ्या अहमदाबाद येथील विमान अपघाताच्या समोर आलेल्या व्हिडीओ-फोटोवरून दिसून येते की, पायलटने लँडिंग गियर थोडा बंद करण्याचा प्रयत्न केला; परंतु लगेचच तो पुन्हा बाहेर काढला. कदाचित त्याला वाटले असेल, की विमानाची शक्ती किंवा जोर कमी होत आहे. उड्डाणानंतर लगेचच विमानाची शक्ती गेली असण्याची शक्यता आहे. दुसरी शक्यता अशी आहे, की काही यांत्रिक किंवा हायड्रॉलिक बिघाडामुळे लँडिंग गियर खाली अडकला असेल. अशा परिस्थितीत, पायलटने हवेचा प्रतिकार कमी करण्यासाठी आणि वेग वाढवण्यासाठी फ्लॅप्स लवकर बंद केले असतील. कारण गियर आणि फ्लॅप्स दोन्ही बाहेर पडल्याने खूप प्रतिकार होतो. त्यामुळे विमानाला उंच जाणे कठीण होते; परंतु कमी उंचीवर आणि कमी वेगाने फ्लॅप्स लवकर बंद करणे खूप धोकादायक आहे. कारण ते विमान उचलणारी शक्ती (लिफ्ट) कमी करते आणि विमान थांबण्याचा धोका वाढवते. विमान जास्त हललेले दिसत नव्हते, याचा अर्थ वैमानिकांचे नियंत्रण होते. उजवा रडार वापरला गेला होता. त्यामुळे डाव्या इंजिनमध्ये बिघाड झालेला असू शकतो, असेही सांगितले गेले;परंतु त्यामुळे विमान कोसळण्याचे कारण स्पष्ट होत नाही. ६०० फूट उंचीवर गियर आणि फ्लॅप्स बंद करणे हे खूप चुकीचे आहे. हे कदाचित तांत्रिक बिघाडांमुळे किंवा वैमानिकांच्या आपत्कालीन प्रयत्नांमुळे घडले असेल. अखेर, विमानाची उंची कमी झाली आणि ते थांबले. कारण लिफ्ट कमी होती आणि प्रतिकार जास्त होता. यामुळे, टक्कर होण्यापूर्वी वैमानिक विमान वाचवू शकले नाहीत. आता पुढील चौकशी केली जाईल. फ्लाइट डेटा आणि कॉकपिट रेकॉर्डिंगच्या तपासणीत या चुकांकडे अधिक लक्ष दिले जाईल. अहमदाबादमध्ये 'एअर इंडिया'चा ज्या विमानाचा अपघात झाला, ते बोईंगचे ७८७ ड्रीमलाइनर होते. त्याचे आतापर्यंत फार अपघात झाले नाहीत. या आधीही बोईंग विमाने अनेक वेळा कोसळली आहेत. २०२४ मध्ये दक्षिण कोरियामध्ये बोईंगचे एक विमान कोसळले होते. त्यात सुमारे १८० जणांना आपला जीव गमवावा लागला. यामध्ये बोईंगचे ७३७-८०० विमान होते. ते आता ७३७ मॅक्सची नवीन आवृत्ती आहे. गेल्या वर्षी जानेवारीमध्ये, एका वेगळ्या घटनेत, उड्डाणादरम्यान ७३७ मॅक्सच्या दरवाजाचा प्लग उडाला. याशिवाय, २०१८ आणि २०१९ मध्ये बोईंग ७३७ मॅक्स विमानेदेखील कोसळली. त्यात लायन एअर फ्लाइट ६१० आणि इथिओपियन एअरलाइन्स फ्लाइट ३०२ यांचा समावेश आहे. त्यामुळे विमान थांबवावे लागले आणि कंपनीला ३० अब्ज डॉलर्सपर्यंतचे नुकसान झाले. २०१८ आणि २०१९ च्या अपघातांमध्ये १८९ आणि १५७ जणांना आपले प्राण गमवावे लागले. तथापि, ते अजूनही बोईंग ७३७-८०० सह कार्यरत आहे. जेव्हा बोईंग विमाने सतत अपघात होत होती, तेव्हा बोईंग ७३७ मॅक्सची चौकशी करण्यात आली. तपासणीत 'मॅन्युव्हरिंग कॅरेक्टरिक्स ऑगमेंटेशन सिस्टम' (एमसीएएस) शी संबंधित समस्या उघडकीस आली. या प्रणालीमुळे मॅन्युअल लँडिंगवरील अवलंबित्व कमी झाले होते; परंतु वैमानिकांना त्याबद्दल फारशी माहिती देण्यात आली नव्हती. २०१८ आणि २०१९ मध्ये ३४६ प्रवासी आणि क्रू सदस्यांना आपले प्राण गमवावे लागले. या अपघातानंतर, या विमानाचे ऑपरेशन थांबवण्यात आले. नंतर ते अपडेट करण्यात आले आणि बोईंग ७३७-८०० या नावाने कार्यान्वित करण्यात आले. बोईंगच्या ७८७ ड्रीमलाइनरला यापूर्वी कधीही अपघात झाला नव्हता. बोईंग विमानांबद्दल आधीच अलर्ट आले होते. या अपघातामुळे पुन्हा ७८७ च्या सुरक्षिततेबद्दल कठीण प्रश्न निर्माण झाले आहेत. या विमानाबद्दल वर्षानुवर्षे इशारे दिले जात होते. ७८७ च्या 'फ्यूजलेज'चे काही भाग योग्यरित्या जोडले गेले नव्हते. त्यामुळे विमानाच्या संरचनेला धोका निर्माण झाला होता. बोईंग पार्टनर सुविधेतील मेकॅनिक रिचर्ड क्युवास यांनी २०२३ मध्ये 'निकृष्ट उत्पादन' झाल्याचे म्हटल्यानंतर त्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. 'फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन' (एफएए) या दाव्यांची सक्रियपणे चौकशी करत आहे. 'बोईंग'ने जाणूनबुजून सुरक्षिततेशी तडजोड केल्याचा इन्कार केला. ७८७ सुरक्षित असल्याचे सांगितले आणि टिकाऊपणा किंवा दीर्घायुष्याला कोणताही तात्काळ धोका नसल्याचे म्हटले. तथापि, आता या मोठ्या अपघातानंतर, बोईंग पुन्हा एकदा चौकशीच्या कक्षेत आले आहे.

बोईंग विमानांना जगभरात सुमारे सहा हजार अपघाताच्या घटना घडल्या आहेत. त्यापैकी ४१५ प्राणघातक होते. अपघातात नऊ हजारांहून अधिक लोक मरण पावले आहेत. जगभरात उड्डाण करणाऱ्या हजारो प्रवासी विमानांपैकी किमान चार हजारांहून अधिक विमाने बोईंग ७३७-८०० ची आहेत. न्यू यॉर्क टाइम्सच्या एका अहवालात म्हटले आहे, की आशिया, युरोप आणि उत्तर अमेरिका हे काही प्रमुख खंड आहेत, जिथे बोईंग विमाने वापरली जातात. एअर इंडियाचे बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर विमान अहमदाबादहून उड्डाण केल्यानंतर काही मिनिटांतच कोसळले. त्यात २९७ जणांचा बळी गेला. हा अपघात गेल्या दशकातील जगातील सर्वात मोठा विमान अपघात ठरला आहे. अपघातानंतर, विमानाच्या ब्लॅक बॉक्सचा शोध आणि विश्लेषणाला प्राधान्य दिले जात आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे, की या महत्त्वाच्या डेटाचे पूर्णपणे डीकोड आणि विश्लेषण करण्यासाठी अनेक आठवडे ते अनेक महिने लागू शकतात. बोईंग ७८७ ड्रीमलाइनरच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या विमानात एवढ्या प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. हे विमान २०११ पासून व्यावसायिक सेवांमध्ये आहे आणि आजपर्यंत सर्वात सुरक्षित विमानांमध्ये त्याची गणना केली जाते. त्यामुळे अहमदाबादच्या अपघाताबाबत 'ब्लॅक बॉक्स' च्या विश्लेषणातून काय माहिती मिळते, त्यातून अपघाताचे खरे कारण समजू शकेल. 'ब्लॅक बॉक्स'मध्ये दोन केशरी रंगाची उपकरणे असतात. पहिले म्हणजे 'फ्लाइट डेटा रेकॉर्डर' (एफडीआर). ते विमानाची उंची, वेग, इंजिनची स्थिती आणि पायलटने केलेल्या प्रत्येक तांत्रिक कृतीची नोंद करते. दुसरे म्हणजे 'कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर' (सीव्हीआर). ते वैमानिकांचे संभाषण, कंट्रोल टॉवरशी रेडिओ संपर्क आणि कॉकपिटमधील इतर आवाज रेकॉर्ड करते. अमेरिकन संघटना 'नॅशनल ट्रान्सपोर्टेशन सेफ्टी बोर्ड' (एनटीएसबी) नुसार, 'ब्लॅक बॉक्स'मध्ये २५ तासांपर्यंतच्या सतत उड्डाणाची माहिती रेकॉर्ड केली जाते. अहमदाबाद अपघातात ही माहिती खूप महत्त्वाची ठरेल. त्यातून अपघाताचे कारण तांत्रिक बिघाड, इंजिनमध्ये बिघाड, पायलटची चूक किंवा इतर काही कारण होते की नाही हे कळेल. तज्ज्ञांच्या मते, 'टेकऑफ'नंतर लगेच उंची वाढवणे आणि आपत्कालीन कॉल पाठवणे अशा परिस्थितीत, इंजिनच्या कामगिरीची आणि इशारा सिग्नलची माहिती 'एफडीआर'कडून उपलब्ध होईल, तर 'सीव्हीआर' त्या क्षणी वैमानिकांनी केलेले प्रयत्न आणि संवाद उघड करेल. 'ब्लॅक बॉक्स' मिळाल्यानंतर, तो 'एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो ऑफ इंडिया' (एएआयबी) किंवा कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळेत पाठवला जातो. जर उपकरण खराब झाले, तर त्यातील मेमरी काढून दुसऱ्या सिस्टीममध्ये ट्रान्सप्लांट केली जाते. तपास प्रक्रियेत फ्लाइट डेटा आणि ऑडिओ एका शेअर केलेल्या टाइमलाइनवर एकत्र करणे आणि त्याची तुलना एअर ट्रॅफिक कंट्रोल रेकॉर्ड आणि रडार डेटाशी करणे समाविष्ट आहे. तपासकर्ते आता विमानाच्या अंतिम उड्डाणाचे दृश्यमानपणे पुनरुज्जीवन करण्यासाठी 'थ्री डी सिम्युलेशन'देखील तयार करू शकतात.

# प्राण्यांसाठी सर्वात मोठे संकट

**पर्यावरण**

**- मिलद बेंडाळे,**
**पर्यावरण अभ्यासक**



शहरीकरण, हवामानबदल आणि वन्यजीव संवर्धन यांच्यात संतुलन कसे राखायचे हा आजचा मोठा प्रश्न आहे. एका संशोधनात आढळून आले की सहा वेगवेगळ्या वर्गांच्या किमान एक चतुर्थांश प्रजातींना हवामानबदलाचा धोका आहे. आतापर्यंत अतिशोषण आणि अधिवास नष्ट होणे जैवविविधतेच्या नुकसानाचे पहिले कारण मानले जात होते; परंतु हवामान वेगाने बदलणे पृथ्वीवरील प्राण्यांसाठी तिसरे सर्वात मोठे संकट बनेल.

'ओएसयू कॉलेज ऑफ फॉरेस्ट्री' आणि मेक्सिकोच्या संशोधकांनी सार्वजनिकरित्या उपलब्ध असलेल्या जैवविविधता डेटासेटचा वापर करून ३५ विद्यमान वर्गांमधील ७० हजार ८१४ प्रजातींच्या प्राण्यांच्या डेटाचे परीक्षण केले. 'इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर' (आययूसीएन)ने केलेल्या मूल्यांकनानुसार, संशोधकांनी वर्ग आणि हवामानबदलाच्या धोक्यांच्या आधारावर प्रजातींचे विभाजन केले. या वर्गांमध्ये अर्कनिड्स आणि चिलोपोडन्स (सेंटीपीड्स) तसेच अँथोझोअन्स आणि हायड्रोझोअन्स (जेलीफिश आणि कोरलशी संबंधित सागरी अपृष्ठवंशी प्राणी) यांचा समावेश आहे. इतर वर्गांमधील प्रजातींचे प्रमाण खूपच कमी आहे, जे तापमानवाढीच्या हवामानामुळे थेट धोक्यात आहेत. संशोधकांना समुद्रातील अपृष्ठवंशी प्राण्यांबद्दल विशेष काळजी आहे, जे हवामानबदलामुळे होणारी बहुतेक उष्णता शोषून घेतात. हे प्राणी अधिकाधिक असुरक्षित होत आहेत कारण त्यांची हालचाल करण्याची आणि प्रतिकूल परिस्थितीतून लवकर बाहेर पडण्याची क्षमता मर्यादित आहे. हवामान बदलामुळे मानव आणि वन्य प्राण्यांमधील संघर्ष वाढत आहे. उष्णतेच्या लाटा, वणवे, दुष्काळ आणि पूर यासारख्या घटनांमुळे मोठ्या प्रमाणात मृत्यू होऊ शकतात. परागण आणि परजीवीवाद यासारख्या प्रजातींच्या अंतर्गत परस्परसंवादावरदेखील परिणाम होण्याची शक्यता आहे, जे परिसंस्थेच्या कार्यासाठी आवश्यक आहेत. मानवनिर्मित सीमा आणि हवामानबदल वन्यजीव धोक्यात वाढ करतात.

संशोधकांनी म्हटले आहे की, पाण्याच्या वाढत्या तापमानामुळे इस्रायलच्या किनाऱ्यावरील मोलस्क प्राण्यांच्या संख्येत नव्वद टक्के घट होणे अपृष्ठवंशी प्राणी किती असुरक्षित आहेत, हे दर्शवते. इतर उदाहरणांमध्ये २०२१ च्या पॅसिफिक नॉर्थवेस्ट हीट डोम दरम्यान अब्जावधी इंटरटाइडल इनव्हर्टेब्रेट्सचा मृत्यू आणि २०१६ मध्ये आलेल्या तीव्र सागरी उष्णतेच्या लाटेनंतर ग्रेट बॅरियर रीफच्या २९ टक्के भागात कोरलचा विनाशकारी मृत्यू यांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात मृत्युदर हा फक्त अपृष्ठवंशी प्राण्यांपुरता मर्यादित नाही. २०१५ आणि २०१६ मध्ये उत्तर अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सुमारे ४० लाख कॉमन मुरे हे तीव्र सागरी उष्णतेच्या लाटेमुळे, बदलत्या अन्नजाळ्यामुळे आणि उपासमारीने मृत्युमुखी पडले. त्याच उष्णतेच्या लाटेमुळे पॅसिफिक कॉडमध्ये ७१ टक्के घट झाली, कारण चयापचय मागणी वाढली आणि शिकार बेस कमी झाला. उत्तर पॅसिफिकमध्ये सुमारे ७,००० हंपबॅक व्हेलच्या मृत्यूमागे सागरी उष्णतेच्या लाटांची भूमिका असू शकते. वन्यजीवांना असलेल्या हवामानबदलाच्या धोक्यांबद्दल गोळा केलेली माहिती तुलनेने कमी आहे. बहुतेक वन्य जीव वर्गांचे (१०१ पैकी ६६) अद्याप 'आययूसीएन'ने कोणत्याही प्रजातीचे मूल्यांकन केलेले नाही. आज जिवंत वन्य जीव प्रजातींपैकी मूल्यांकन केलेल्या ७० हजार ८१४ प्रजाती सुमारे ५.५ टक्के आहेत. हवामान बदलामुळे बंगालच्या उपसागरात ऑक्सिजनची कमतरता वाढत आहे, मृत क्षेत्रे तयार होत आहेत.

अभ्यास संशोधनात केलेले विश्लेषण हे वन्य जीव प्रजातींना असलेल्या हवामानाच्या धोक्यांचे मूल्यांकन करण्याचा एक प्रारंभिक प्रयत्न आहे. माहितीपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी धोके समजून घेणे महत्त्वाचे आहे. सर्व परिसंस्थांमध्ये प्राण्यांच्या प्रजातींसाठी हवामानबदलामुळे होणाऱ्या मोठ्या प्रमाणात मृत्युदराच्या घटनांवर जागतिक डेटाबेस आवश्यक असून सध्या दुर्लक्षित प्रजातींचे मूल्यांकन जलद करणे आवश्यक आहे. सर्व प्रजातींना हवामानामुळे होणाऱ्या धोक्यांचे मूल्यांकन करण्याची आणि अनुकूलन क्षमतेचा चांगल्या प्रकारे विचार करण्याची आवश्यकता आहे, असे संशोधकांनी पेपरमध्ये म्हटले आहे. जैवविविधता आणि हवामानबदल धोरण नियोजन जगभरात एकत्र आणण्याची आवश्यकता आहे. एक चतुर्थांश प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. गोड्या पाण्यातील ६४ परिसंस्था पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या एक टक्क्यापेक्षा कमी भाग व्यापतात; परंतु त्या ग्रहावरील जीवनासाठी महत्त्वाच्या आहेत. नवीन संशोधनातून दिसून आले आहे की वातावरणाचे नुकसान गोड्या पाण्यातील जीवसृष्टीला नष्ट होण्याच्या जवळ पोहोचवत आहे. २४ टक्के प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. मासे, खेकडे आणि ड्रॅगन फ्लायच्या हजारो प्रजाती येत्या काही दशकांमध्ये नामशेष होऊ शकतात. गोड्या पाण्यातील सुमारे २४ हजार प्रजातींच्या आरोग्याच्या एका महत्त्वाच्या मूल्यांकनात आढळून आले आहे की सुमारे एक चतुर्थांश प्रजाती नामशेष होण्याच्या स्थितीत आहेत. यापैकी सुमारे एक हजार प्रजाती अत्यंत धोक्यात असल्याचे मानले जाते, तर २०० आधीच नामशेष होण्याची शक्यता आहे.

हे आकडे हिमनगाचे फक्त टोक आहेत. गोड्या पाण्यातील जैवविविधता जपणे हे जागतिक आव्हान आहे. कारण हजारो प्रजातींच्या नामशेष होण्याचा धोका योग्यरित्या समजून घेण्यासाठी शास्त्रज्ञांकडे आवश्यक ती माहिती नाही. या प्राण्यांना समजून घेण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कृती करण्याची आवश्यकता आहे, असे अभ्यासाच्या प्रमुख लेखक कॅथरीन सेयर म्हणतात. गोड्या पाण्यातील भूदृश्ये पृथ्वीवरील सर्व ज्ञात प्रजातींपैकी दहा टक्के प्रजातींची घरे असून अब्जावधी लोकांसाठी सुरक्षित पिण्याचे पाणी, उपजीविका, पूर नियंत्रण आणि हवामानबदल कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. या अभ्यासाचे निष्कर्ष 'नेचर जर्नल'मध्ये प्रकाशित झाले. जमिनीवरील सर्व जीवांसाठी ताजे, स्वच्छ पाणी महत्त्वाचे असले, तरी गोड्या पाण्यातील परिसंस्था पृथ्वीवर सर्वात धोक्यात आहेत. अन्न, पाणी आणि संसाधनांची मागणी वाढत असताना गोड्या पाण्यातील पर्यावरण वाढत्या दबावाखाली आहे. दलदल, खारफुटी आणि खाऱ्या दलदलींसह विशेषतः पाणथळ जागा या नुकसानाचा फटका सहन करत आहेत. एका अंदाजानुसार १७०० पासून भारताच्या आकारमानाइतके क्षेत्र म्हणजे तब्बल ३.४ दशलक्ष चौरस किलोमीटर पाणथळ जागा नष्ट झाल्या आहेत. वुडविले कार्स्ट केव्ह क्रेफिश फ्लोरिडाच्या फक्त एकाच भागात आढळते, जिथे त्याला प्रदूषण आणि अधिवासाचा ऱ्हास यासारख्या धोक्यांचा सामना करावा लागतो. पाणथळ जागांचा नाश केवळ तेथे राहणाऱ्या प्राण्यांना आणि वनस्पतींनाच हानी पोहोचवत नाही, तर हवामानबदलाशी लढण्याची आणि पूर रोखण्याची क्षमतादेखील मर्यादित करतो.

गोड्या पाण्याचे स्रोतदेखील अनेक आव्हानांना तोंड देत आहेत. नद्यांवर पाणी साठवणे आणि धरणे वन्यजीवांसाठी उपलब्ध अधिवास कमी करत आहेत. कोलोरॅडो नदीसारख्या काही नद्या आता समुद्रापर्यंत पोहोचत नाहीत. या कमी होत चाललेल्या अधिवासांमध्ये राहणारे प्राणी सांडपाणी, औद्योगिक आणि प्लास्टिक प्रदूषणामुळे प्रभावित होतात. महासागरांपेक्षा गोड्या पाण्याच्या वातावरणाचा अभ्यास खूपच कमी केला गेला आहे. निरोगी गोड्या पाण्यातील परिसंस्थांना पाठिंबा देण्यासाठी गोड्या पाण्यातील प्रजातींचा डेटा संवर्धन धोरणांमध्ये आणि पाणी वापर व्यवस्थापनात सक्रियपणे समाविष्ट करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व प्रजातींपैकी सुमारे दहा टक्के गोड्या पाण्यावर अवलंबून असताना केलेला अभ्यास विशेषतः चार गटांशी संबंधित होता; जे जवळून संबंधित आहेत. डेकापॉड्स हा क्रस्टेशियन्सचा एक मोठा गट आहे, ज्यामध्ये खेकडे, कोळंबी, क्रेफिश, कोळंबी आणि लॉबस्टर यांचा समावेश आहे. अनेक प्रजाती समुद्रात राहतात, तर काही जगभरातील नद्या आणि ओढ्यांमध्ये राहतात, जिथे सुमारे तीस टक्के प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. डेकापॉड्ससाठी प्रदूषण हा सर्वात मोठा धोका आहे. कीटकांना मारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक कीटकनाशकांमुळे जलमार्गांमध्ये खेकडे आणि कोळंबी माशांचेही नुकसान होते. विशेषतः हे प्राणी त्यांचे पंख सोडतात तेव्हा धोका वाढतो. ही रसायने माशांनादेखील धोका निर्माण करतात आणि त्यांच्या विकासावर, प्रजननक्षमतेवर आणि वर्तनावर परिणाम करू शकतात.

ओडोनेट्स हा कीटकांचा एक गट आहे. त्यामध्ये ड्रॅगनफ्लाय आणि डॅमसेल्फलाई यांचा समावेश आहे. ते हवाई भक्षक म्हणून सर्वात जास्त ओळखले जाऊ शकतात, तरी हे प्राणी त्यांचे बहुतेक आयुष्य गोड्या पाण्यातील नवजात शिशु म्हणून घालवतात. धोक्यात असलेल्या अर्ध्याहून अधिक प्रजाती जमिनींचे शेतीत रूपांतर झाल्यामुळे त्यांच्या अधिवासाचे नुकसान होण्याचा धोका वाढतो.

# आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर नगरपरिषद 'ॲक्शन मोडवर'

## गंगापूर नगरपरिषदेला दिला होता संजय जाधवांनी आंदोलनाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर** : गंगापूर शहरातील भीषण पाणीटंचाई, जलप्रदूषण आणि पाणीपुरवठा योजनेतील गंभीर त्रुटींविरोधात माजी नगराध्यक्ष संजय जाधव यांनी दि. ३ जून २०२५ रोजी गंगापूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना एक ठणकावणारे पत्र दिले होते. या पत्रात त्यांनी नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा व्हावा यासाठी सात दिवसांत उपाययोजना न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता.

नगराध्यक्षांच्या या इशाऱ्यानंतर प्रशासन हरकत घेताना दिसत असून नगरपरिषदेने तातडीने कामाला सुरुवात केली आहे. विशेषतः कायगाव येथील गोदावरी नदीवरील 'जॅक वेल' परिसरातील विहिरीतील गाळ काढणे व फुटलेली पाइपलाइन दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.

जॅक वेल परिसरातील विहिरीतील गाळ त्वरित काढणे, गणेश ठुबे यांना पाणीपुरवठा योजनेतून बाजूला काढून नवीन अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यात नियमितता व स्वच्छता सुनिश्चित करणे, दोषी



अधिकाऱ्यांवर तातडीने चौकशी करून कारवाई करणे, अशा दिलेल्या पत्रात मागण्या होत्या.

पत्रात त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, जर मागण्या सात दिवसांत मान्य न झाल्या तर जनतेच्या भावना लक्षात घेता आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल आणि त्याची पूर्ण जबाबदारी प्रशासनावर असेल.

या पार्श्वभूमीवर, नागरिकांमध्ये समाधानाचे सूर असून प्रशासनाचे लक्ष या गंभीर समस्येकडे वळल्याने काहीसा दिलासा मिळाल्याचे दिसत आहे. मात्र प्रत्यक्षात परिणामकारक व दीर्घकालीन उपाययोजना कितपत प्रभावी ठरतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# पायरेन्समध्ये 'बँकिंग-विमा' अभ्यासक्रम उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना उद्योगजगतातील प्रत्यक्ष कौशल्य देण्याच्या उद्देशाने पायरेन्स आयबीएमए आणि बजाज फिनसर्व यांच्या संयुक्त विद्यमाने बँकिंग, वित्त व विमा क्षेत्रातील विशेष प्रमाणपत्र अभ्यासक्रम पायरेन्स आयबीएमएम लोणी येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना बँकिंग, वित्तीय व्यवहार व विमा या क्षेत्रात आवश्यक असलेल्या मूलभूत ज्ञानाबरोबरच व्यावहारिक कौशल्ये प्रदान करणे हा होता.

चारुदत्त गानोरकर यांनी सत्रात विद्यार्थ्यांना बँकिंगच्या मूलभूत संकल्पना, बँकेचे कार्य, व्यवहार, कर्जप्रक्रिया, खाते प्रकार, डिजिटल बँकिंग याविषयी सखोल माहिती दिली. समीर घोटोस्कर यांनी विद्यार्थ्यांना विमा क्षेत्रातील मूलभूत बाबी, जीवन आणि अपघात विमा, पॉलिसी समज, क्लेम प्रक्रिया आणि विमा क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत माहिती दिली.



शार्दूल शिरोळकर यांनी विद्यार्थ्यांना स्वव्यवस्थापन, संवाद कौशल्ये आत्मविकास, वेळ व्यवस्थापन, नेतृत्वगुण, आत्मविश्वास, प्रभावी संवाद कौशल्ये आणि मुल्याधारित वर्तन संधींबाबत माहिती दिली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देत प्रवरा समूहाने सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य केले आहे विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून कायमच विद्यार्थी हितास प्राधान्य दिले आहे.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, संकल्पनेतून संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रियाताई ढोकणे पाटील, संस्थेचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन केले जाते त्याचाच एक भाग पायरेन्स आयबीएमएममध्ये बँकिंग, वित्त व विमा क्षेत्रातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा विशेष प्रमाणपत्र अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला.

पायरेन्स आयबीएमएचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी संस्थेने भविष्यात अशाच प्रकारचे व्यावसायिक अभ्यासक्रम व उद्योगाभिमुख उपक्रम सातत्याने राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे, तर व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शक ठरला.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## पंतप्रधान मोदींकडून दुर्घटनास्थळाची पाहणी

वाहतूक मंत्रालयाने म्हणजेच डीजीसीएने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, सरकारने बोईंग ७८७-८/९ विमानांच्या सुरक्षा तपासणीचे आदेश दिले आहेत. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून डिजीसीएने एअर इंडिया कंपनीच्या बोईंग ७८७-८/९ विमानांच्या ताफ्यावर अतिरिक्त देखभाल आणि तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा

आ. विक्रमसिंह पाचपुते यांनी तहसीलदार, महावितरण कंपनीचे अधिकारी, कृषी अधिकारी तसेच ग्रामविकास अधिकाऱ्यांना झालेल्या नुकसानीची पाहणी करून तत्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नुकसान झालेला एकही शेतकरी अथवा नागरिक पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचेही पाचपुते यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. पाचपुतेंच्या भूमिकेमुळे नुकसानग्रस्त नागरिकांना, शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, नागरिकांकडून आ. पाचपुते यांचे आभार मानले आहे. नुकसानग्रस्तांना वाऱ्यावर सोडणार नाही !वादळी वाऱ्यासह शेतकरी, दुग्ध व्यावसायिक, सर्वसामान्य नागरिकांच्या झालेल्या नुकसानीचे प्रशासकीय पातळीवर तात्काळ पंचनामे करण्यात येणार आहेत. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना व नागरिकांना शासनाच्या वतीने लवकरात लवकर आर्थिक मदत देण्यात येईल. आपत्तीग्रस्त परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहे.

## कौशल्य आधारित शिक्षण गरजेचे : मा. मंत्री थोरात

करिअर करण्यासाठी मोकळी संधी द्यावी. यासाठी असलेला थ्री इडियट चित्रपट हा अत्यंत लोकप्रिय ठरला होता. यामध्ये आमिर खान यांनी पारंपारिक घोगमपट्टी असलेल्या शिक्षण पद्धतीमध्ये बदल करून आवडीच्या क्षेत्रामध्ये करिअर कसे करता येईल, असा चांगला संदेश दिला होता आणि त्यामुळे हा चित्रपट तरुणांसह पालकांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरला होता.या चित्रपटामध्ये काश्मीरच्या लडाख खोऱ्यामध्ये कौशल्य आधारित स्कूल सुरू करणारे पर्यावरण प्रेमी तथा थोर शिक्षण तज्ज्ञ सोनम वांगचुक तथा फुंगसुख वांगडू यांची भूमिका आमिर खान यांनी साकारली होती. यानंतर या शिक्षण तज्ज्ञांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठे कुतूहल निर्माण झाले आहे. माजी मंत्री थोरात म्हणाले की, आइस स्टूपा या प्रकल्पाने पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी नवा मार्ग दाखवला असून त्यांच्या नावीन्यपूर्ण कामामुळे ते तरुण पिढीचे खरे हिरो ठरले आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून पूर्ण क्षमतेने योगदान दिल्यास त्यांना नक्की यश मिळणार असून कौशल्य आधारित शिक्षण पद्धती अत्यंत गरजेचे असल्याचे ते म्हणाले. शरयू देशमुख म्हणाल्या की, फुंगसुख वांगडू तथा सोनम वांगचुक यांची भेट ही संस्मरणीय असून त्यांनी दिलेल्या सूचनांचे जास्तीत जास्त पालन करताना अमृतवाहिनी शिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी अधिक काम करू, असे त्या म्हणाल्या. या भेटीनंतर माजी मंत्री थोरात यांचे पर्यावरण तज्ज्ञ वांगचुक यांनी स्वागत करून संपूर्ण संस्था व लडाखचा परिसराची पाहणी करून माहिती दिली. तर शरयू देशमुख यांनी त्यांना संगमनेरला येण्याची आमंत्रण दिले.

## शनैश्वर देवस्थानने १६७ कर्मचाऱ्यांना हटवले

हिंदू समाजाकडून मोठा मोर्चा काढला जाईल, असा इशारा दिला होता. २१ मे २०२५ रोजी मुस्लिम कारागिरांनी मंदिराच्या पवित्र व्यासपीठावर ग्रिल बसवले आणि भगवान शनिदेवाच्या व्यासपीठाची स्वच्छता आणि रंगरंगोटी केली होती. तेव्हा हे प्रकरण अधिकच तापले होते. या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि हिंदू संघटनांनी तीव्र आक्षेप घेतला होता. त्यानंतर आता मंदिराच्या विश्वस्त मंडळाने सर्व मुस्लिम कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत मंदिर ट्रस्टने स्पष्टीकरण दिलं होतं, त्यानुसार ट्रस्टमध्ये ११४ मुस्लिम कर्मचारी काम करतात हे मान्य केलं आहे. मात्र ट्रस्टच्या म्हणण्यानुसार, या कर्मचाऱ्यांपैकी एकाही मुस्लिम कर्मचाऱ्यांची ड्युटी मंदिराच्या मुख्य गर्भगृहात किंवा चबुतऱ्यावर नाही. हे कर्मचारी मुख्यतः शेती विभाग, कचरा व्यवस्थापन विभाग आणि शिक्षणाशी संबंधित कामांमध्ये कार्यरत आहेत. यापैकी ९९ कर्मचारी मागील पाच महिन्यांपासून कामावर अनुपस्थित असून त्यांच्या पगारावरही आळा घालण्यात आला आहे. उरलेले १५ कर्मचारी अनेक वर्षांपासून सेवा देत आहेत. ज्यात काहींचा अनुभव २० वर्षांहून अधिक आहे. शनि शिंगणापूर मंदिर ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकावे, या मागणीसाठी हिंदू संघटना आक्रमक झाली होती. याबाबत आज (१४ जून) मोर्चा काढण्याचाही इशारा दिला होता.

## ... आता निवडणूक प्रक्रियेला गती मिळणार

आयोगाकडे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना १८ ऑगस्ट पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे. दरम्यान निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी आतापासूनच मोर्चे बांधणी सुरू केली आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात राजकीय घडामोडींनी वेग घेतला आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# निळवंडेच्या पाण्याने शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद : ओहोळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तळेगाव दिघे** : दुष्काळग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तळेगाव भागातील विविध गावांमध्ये माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून डाव्या कालव्यातून पाणी आल्याने गावतळी आणि बंधारे भरून घेण्यात आले आहे. या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण झाला, असे प्रतिपादन राज्य सहकारी साखर संघाचे उपाध्यक्ष बाबा ओहोळ यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील देवकौठे, चिंचोली गुरव, पोखरी हवेली येथे निळवंडे कालव्याद्वारे भरलेल्या बंधाऱ्यांच्या जलपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी थोरात कारखान्याचे संचालक संपत गोडगे, दूध संघाचे संचालक भारत मुंगसे, सरपंच विलास सोनवणे, प्रभाकर कांदळकर, विलास सोनवणे, राजेंद्र मुंगसे, राजेंद्र कहांडळ, तुकाराम कहांडळ, डॉ. समाधान मुंगसे, दत्तात्रय मुंगसे, साहेबराव कहांडळ, संतोष आरोटे, मच्छिंद्र कहांडळ, अशोक सांगळे, बापू शेवकर, अजित शेवकर, त्र्यंबक



मुंगसे, दादापाटील मुंगसे, शत्रुघ्न मुंगसे, ज्ञानेश्वर मुंगसे, नामदेव कहांडळ, सुरेश मुंगसे, काशिनाथ कहांडळ, भाऊसाहेब कहांडळ, नंदू मोकळ, सदेश गोडगे, विजय गोडगे आदी पदाधिकारी उपस्थित होते. ज्या लोकांना कालव्यांचे पाणी मिळाले नाही, अशा वरच्या भागातील शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी ते पाठपुरावा करत आहे. सर्व शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये समृद्धी आणण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले.

ओहोळ पुढे म्हणाले, शेतशिवारात निळवंडे धरणाचे पाणी आल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून मोठ्या उत्साहात जलपूजन करण्यात येत आहे. तळेगाव भागातील दुष्काळीपट्ट्याकरीता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी निळवंडे धरण आणि कालवे पूर्ण केले. या कामासाठी त्यांचे मोठे योगदान आहे. मात्र, ज्यांचे कोणतेही योगदान नाही ती मंडळी श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहे.



## पुणतांबा परिसरात चाराटंचाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा** : परिसरात गेल्या १० दिवसापासून पावसाने उघडीप दिल्यामुळे परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न येत्या काही दिवसात गंभीर होण्याची शक्यता आहे. तसेच सध्या जनावरांसाठी चाराटंचाई जाणवण्यास सुरुवात झाली आहे. पुणतांबा परिसरात अवकाळी पावसामुळे जे थोडेफार गवत उगवलेले होते ते सध्या पिवळे पडून जळण्यास सुरुवात झाली आहे. मान्सून पूर्व पावसामुळे परिसरात खरीप पिकासाठी शेतीच्या मशागती तातडीने करण्यात आल्या. तसेच अवघे पाच टक्के शेतकरी वर्गाने सिंचनाची सोय व पावसाची शक्यता गृहीत धरून खरीप पिकांच्या पेरण्या केल्या. त्यातील बरीच पिके उगवून आली आहेत. मात्र पावसामुळे ही पिके सुद्धा धोक्यात आली आहे. येत्या आठ दिवसात पावसाने हजेरी लावली नाही तर ही पिकेही हातातून जाण्याची शक्यता आहे. परिसरात सरासरी साडेचार ते पाच इंच पावसाची नोंद झालेली आहे. सध्या परिसरातील विहिरींच्या पाणी पातळीत वेगाने लक्षणीय घट होत आहे. चारा टंचाईमुळे परिसरात आलेल्या मेंढपाळांनी परतीची वाट धरलेली आहे. ज्यांच्याकडे जे थोडेफार पशुधन आहे त्यांना सुध्दा आता विकत चारा घेण्याची वेळ आली आहे.

## पिंपरी निर्मळमध्ये भरदिवसा घरफोडी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पिंपरी निर्मळ** : राहाता तालुक्यातील पिंपरी निर्मळ येथील राजुरी रोडला राहणाऱ्या निळवंडे पाणी कृती समितीचे उपाध्यक्ष उत्तमराव घोरपडे यांच्या घरी चोरट्यांनी भरदिवसा धाडसी चोरी केली आहे. घरी कोणी नसल्याची संधी साधत चोरट्यांनी जवळपास लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला.लोणी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या राजुरी शिवेलगत पिंपरी निर्मळ शिवारात राहणाऱ्या निळवंडे पाटपाणी कृती समितीचे उपाध्यक्ष उत्तमराव घोरपडे कुटुंबासह एका कार्यक्रमासाठी गुरुवारी बाहेरगावी होते. चोरट्यांना या गोष्टीचा अंदाज आल्याने त्यांनी घराचा दरवाजा तोडून व घरातील कपाट फोडून कपाटातील ४० हजार रुपये रोख व अर्धा तोळा सोने चोरून नेले. यात घोरपडे यांची जवळपास एक लाख रुपयांची चोरी झाली. लोणी पोलीस स्टेशनला माहिती कळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ, हेड कॉन्स्टेबल साईनाथ राशिनकर यांनी घटनास्थळी भेट देत श्वानपथकला पाचारण केले. लोणी पोलिसांकडून याबाबत अधिक सखोल चौकशी सुरू आहे. भरदिवसा घरफोड्या करणाऱ्या या चोरट्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

## एकनाथवाडीतील ग्रामस्थांचे तहसील कार्यालयासमोर उपोषण

### विठ्ठल डोंगरेंविरोधात केला गंभीर आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : एकनाथवाडी गावातील डोंगरे नावाच्या व्यक्तीने स्वतः वर धारदार शस्त्राने वार करून खोटा गुन्हा दाखल केला असून, त्याच्या विरोधात कारवाई व्हावी, या मागणीसाठी गावातील ग्रामस्थांनी शुक्रवारी (ता.१३) पाथर्डी तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

गावकऱ्यांनी तहसीलदार आणि पोलिस निरीक्षक यांना दिलेल्या निवेदनात डोंगरेवर गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले आहेत. ०३ जून २०२५ रोजी राख वस्तीवर झालेल्या गोळीबार प्रकरणात डोंगरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच,



डोंगरेने दाखल केलेल्या कलम ३०७ मधील खटल्याची सीआयडीमार्फत चौकशी करण्यात यावी, तसेच त्याने बनावट सरपंच सहीसह केलेल्या शासकीय तक्रारींची चौकशी करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद आहे.

१ ते ८ जूनदरम्यान डोंगरेच्या मोबाईल नंबरचे कॉल डिटेल रेकॉर्ड घेऊन त्याने कोणाच्या सांगण्यावरून खोटा गुन्हा दाखल केला, याचा तपास व्हावा, अशी मागणी केली आहे.पोलिस निरीक्षकांनी कोणतीही चौकशी न करता गुन्हा दाखल केला, ही गंभीर प्रशासनिक चूक असून त्याची चौकशी झाली पाहिजे, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

## अंनिस विषयी समाजमनात आदराची भावना

### माधव बावगे; जिल्हा अंनिसची बैठक संपन्न



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा** : सत्याची आणि वैचारिक-विवेकी विचारांची चळवळ असल्याने इतर कोणत्याही संघटने पेक्षा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटनेबद्दल आणि कार्यकर्त्यांविषयी समाजमनामध्ये आदराची भावना आहे, असे प्रतिपदान महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नवनिर्वाचित राज्य अध्यक्ष माधव बावगे यांनी केले.

अहिल्यानगर येथे जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद भारुळे यांच्या निवासस्थानी माधव बावगे यांचे प्रमुख उपस्थितितमहाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर जिल्हा बैठक संपन्न झाली. त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. राज्य सल्लागार कॉ.बाबा आरगडे, राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, बुवाबाजी संघर्ष विभाग राज्य कार्यवाह ॲड. रंजना गवांदे, जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद भारुळे, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा व देवदत्त साळवे, निधी संकलन कार्यवाह प्रा अशोक गवांदे, जिल्हा सोशल मीडिया कार्यवाह सुखदेव फुलारी, महिला सहभाग जिल्हा कार्यवाह छायाताई बंगाळ उपस्थित होते.बैठकीच्या प्रारंभी महाराष्ट्र अंनिसचे निर्वाचित अध्यक्ष माधव बावगे, नवनिर्वाचित राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, बुवाबाजी संघर्ष विभाग राज्य कार्यवाह ॲड. रंजना गवांदे, कॉ.बाबा आरगडे व स्व.सोपानराव दरंदले पत्रकार रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सुखदेव फुलारी यांचा जिल्हा अंनिसच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## विद्यार्थ्यांना कॉमर्समधून भरपूर संधी-गोंदकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : १२ वीनंतर आपण काय करू शकतो हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील मोठा गोंधळ असतो. ते या घे भरारी तू आकाशी मार्गदर्शन शिबिरामुळे सोपे झाले आहे. खूप मुले सायन्सकडे वळतात. पण कॉमर्समधून भरपूर संधी असतात. मात्र विद्यार्थ्यांनी खचून न जाता अशाप्रकारे मोफत मार्गदर्शन शिबिरातून करिअरबाबत मार्ग शोधावा, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शिर्डी शहराध्यक्ष दिपक गोंदकर, निलेश शिंदे यांनी केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या वतीने शिर्डीत विद्यार्थी आणि पालकांसाठी आयोजित घे भरारी तू आकाशी, स्वप्नांकडे वाटचाल या करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते



बोलत होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे रमेश गोंदकर, बाबासाहेब गोंदकर, संग्राम कोते, निलेश कोते, अमित शेळके, निलेश शिंदे आर्दीच्या हस्ते शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शिबिरासाठी ८ वी ते १२ वीचे विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यावेळी दिपक गोंदकर म्हणाले, आजच्या या विशेष सत्रात अजिंक्य खंडीझोड यांनी सुंदर मार्गदर्शन केले. या ठिकाणी आलेले सर्वजण ग्रुप करून बसले होते. ती खूप चांगली गोष्ट आहे. राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष निलेश शिंदे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी शिवाजी गोंदकर, अनिल कोते, सुशांत अवताडे, सचिन गोंदकर, साई कोतकर, अमोल सुपेकर, अजित जगताप, चंद्रभान बनकर, विशाल नागरगोजे, गंगाधर वाघ, निलेश सुरुडकर, अमोल गिरमे, युनूस सय्यद, राकेश भोकरे, राहुल फुंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.

## चोरीला गेलेला ऐवज केला परत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : चोरीला गेलेले मोबाईल, महिलांच्या दागिण्यांचा कोपरगाव पोलिसांनी शोध लावून तो मुळ मालकांना परत करण्यात आला.

कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन हद्दीमध्ये ७ मे रोजी संदिप रामदास बोळीज (वय ४५ वर्ष,धंदा नौकरी रा. समतानगर ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनमध्ये गुन्ह्याची फिर्याद दिली होती की दि. ६ मे रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास उक्कडगाव ते कोपरगाव रोडवर तिळवणी गावाच्या आसपास, मार्केट कमिटी जवळ एकुण पाच आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या पत्नी बित्रा बोळीज हे त्यांच्या मोटरसायकलने वैजापूरहून कोपरगावकडे जात असताना त्यांना अडवून त्यांच्याडून २१ हजार ६०० रुपये किमतीचे सोन्याच्या दोन वाट्या व १३ मणी व इतर कि.चा एम.आय कंपनीचा मोबाईल अशा वर्णानाचा मुद्देमाल चोरीला गेला होता. त्या अनुषंगाने सदर गुन्ह्याचे गांभिर्य लक्षात घेता वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाने तपास सुरु होता.



सदर गुन्ह्याच्या तपासात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, अहिल्यानगर यांच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधाराने आरोपी राहुल केदारनाथ लोहकणे, कुणाल अनिल चंदनशिवे, निलेश बाळासाहेब भोकरे, प्रमोद कैलास गायकवाड व १ अल्पवयीन आरोपी असे निष्पन्न करुन त्यांच्याकडून चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करून कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनच्या ताब्यात पुढील कारवाई कामी दिला होता. पुढील तपासात पोलीस निरीक्षक संदिप कोळी यांच्या मार्गदर्शनाने पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी यांनी सदर आरोपीनंविरुद्ध पुरावे गोळा करून सदरचा मुद्देमाल फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडुन ओळख पटवुन सदरचा मुद्देमाल हा फिर्यादी यांचाच आहे याची संपूर्ण खात्री करून परत केला.

## वृक्ष भेट देऊन शिक्षकांचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांना स्नेहमेळावा पार पडला. तब्बल २३ वर्षानंतर मित्र-मैत्रिणी भेटल्याने सर्वांचाच आनंद ओसांडून वाहत होता.

श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय या ठिकाणी २००१ - २००२ इयत्ता दहावी बॅच या विद्यार्थ्यांनी अगदी इयत्ता पहिली पासून शालेय जीवन इयत्ता दहावीपर्यंत सोबत हसत खेळत रमत गमत एकत्र जोपासले. परंतु दहावीनंतर मित्र मैत्रिणी यांची भेट होणे दुर्मिळ झाली होती म्हणून येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच विमा प्रतिनिधी यांनी मोबाईल व्हाट्सअप माध्यमातून एकत्र करत मित्रांचे वाढदिवस साजरा करण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु वेळेअभावी अनेकांची उत्सुकता यामध्ये कमी प्रमाणात असल्याने येथील ज्येष्ठ शिक्षक विकास राठोड तसेच गणेश कुसळकर यांनी एकत्र येत डॉ. मतीन शेख, छाया गायकवाड यांच्याशी चर्चा विनिमय करून गेट-टुगेदर स्नेह मेळावा या निमित्ताने सर्व मित्र-मैत्रिणी यांना एकत्र करण्याचा निर्णय घेतला.

# वरिष्ठ पत्रकारांसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करा

## ११ हजार पत्रकार वाट पाहतायत, निधी आहे पण सन्मान नाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : "राज्य शासनाने पत्रकारांसाठी सुरू केलेल्या सन्मान व कल्याण योजनांकडे गंभीरतेने लक्ष देण्याऐवजी हलगर्जीपणा केला जात आहे. निधी असूनही निर्णय होत नाहीत, योजना वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. सध्या ११ हजारांहून अधिक पात्र वरिष्ठ पत्रकार आपल्या सन्मानाची वाट पाहत आहेत. अशा परिस्थितीत आता आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही," असा ठाम इशारा व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी आज सरकारला दिला.

आज माहिती महासंचालनालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत पत्रकारांच्या हक्क आणि सन्मान विषयक विविध मुद्द्यांवर संदीप काळे यांनी ठोस स्वरूपात भूमिका मांडली. पत्रकारांच्या सन्मानासाठी स्वतंत्र आर्थिक लेखाशीर्ष तयार करावे, तसेच आरोग्यविषयक योजना ट्रस्टच्या माध्यमातूनच चालवाव्यात, अशी स्पष्ट शिफारस त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केली.

VOICE OF MEDIA

सध्या ४०१७ वरिष्ठ पत्रकारांची अधिकृत नोंद असून, त्यांना सन्मान दिल्यास सरकारवर केवळ ६.२८ कोटी रुपये खर्च येतो. दरवर्षी फक्त ४० लाख रुपयांची तरतूद पुरेशी ठरेल ही रक्कम शासनाच्या दृष्टीने अत्यंत तुच्छ आहे. त्याशिवाय मध्यप्रदेशात ८५०० पत्रकारांना दरवर्षी २० हजार रुपये मानधन दिले जाते, हे उदाहरण देत महाराष्ट्रानेही यात मागे राहू नये, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

सध्या सरकारकडे पत्रकार सन्मान योजनांसाठी १२० कोटी रुपयांचा निधी जमा असूनही, योजनेच्या प्रभावी आणि नियमित अंमलबजावणीसाठी ५०० कोटी रुपयांची निश्चित तरतूद करणे आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष आवश्यक असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. निधी असूनही जर योजनांचा लाभ पत्रकारांपर्यंत पोहोचत नसेल, तर हा अन्याय आहे, असे मतही त्यांनी मांडले.

राज्यभरातील अडीच हजारांहून अधिक वरिष्ठ पत्रकारांपर्यंत सन्मान योजना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा त्यांनी सविस्तरपणे मांडल्या. सन्मानासाठी पात्रतेची अट ३० वर्षांऐवजी २० वर्षांची पत्रकारिता करावी, सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० ऐवजी ५८ वर्षे करावी, निष्कलंक सेवा बजावलेल्या पत्रकारांसाठी स्वतंत्र समिती स्थापन करावी, आणि जनसंपर्क विभागाकडे वरिष्ठ पत्रकारांची अद्ययावत नोंद उपलब्ध करून द्यावी, या सर्व मागण्यांवर भर दिला.

# आ. कटकेंच्या प्रयत्नांतून शिरूरमध्ये विकासाची नवी दिशा

## आ. कटके यांच्या प्रयत्नातून एसटी बससेवेचे लोकार्पण; आढावा दौऱ्याची यशस्वी सांगता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरूर** : शिरूर-हवेली विधानसभा मतदारसंघात विकासाचे नवे पर्व सुरू करत, आजचा दिवस शिरूरवासीयांसाठी ऐतिहासिक ठरला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महायुती सरकारच्या पाठबळाने आ. ज्ञानेश्वर कटके यांच्या प्रयत्नांतून शिरूर एसटी डेपोमध्ये नव्याने पाच एसटी बसेस दाखल झाल्या.

या बससेवेचा लोकार्पण सोहळा तसेच विविध विकास कामांचा आढावा दौरा काल त्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

एस.टी. महामंडळाच्या माध्यमातून शिरूर शहर व तालुक्यातील प्रवाशांना आता आधुनिक व वेळेवर चालणाऱ्या बससेवेचा लाभ मिळणार आहे. या नवीन बसेसमुळे खास करून शिरूरच्या ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना, महिला वर्गाला आणि नोकरदार नागरिकांना प्रवासात मोठा दिलासा मिळणार आहे. आ. माऊली कटके यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून या सुविधेसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या विनंतीवरून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी त्वरित निर्णय घेतला. लोकार्पण सोहळ्यात आमदार कटके म्हणाले, शासनाच्या सहकार्याने शिरूरसारख्या वाढत्या लोकसंख्येच्या शहराला ही सेवा मिळणे गरजेचे होते. ही सेवा म्हणजे केवळ वाहतूक नाही, तर ग्रामीण जनतेसाठी नवा दुवा आहे.

नियोजित दौऱ्यातून सर्वांगीण विकासाचा आढावा आज दिवसभर आ. माऊली कटके यांनी शिरूर शहरात व तालुक्यात विविध ठिकाणी भेटी देऊन विकासकामांची प्रगती, नागरिकांच्या अडचणी आणि प्रशासनाच्या भूमिकेचा आढावा घेतला.

नगरपरिषद आढावा बैठक नगरपरिषद कार्यालयात झालेल्या बैठकीत शहरातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, नळपाणी योजना, रस्त्यांचे डागडुजी कामे, सांडपाणी निचरा इ. बाबींवर सविस्तर चर्चा झाली. अधिकारी व पदाधिकाऱ्यांना कामांमध्ये गुणवत्ता आणि वेळेचे पालन करण्याच्या सूचना दिल्या.

### मॉडेल शहर घडवण्याचा संकल्प

शिरूर शहराच्या ऐतिहासिक वैभवाला आधुनिकतेची जोड देत, आ. ज्ञानेश्वर कटके यांनी संकल्पनेतील शिरूर या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची सुरुवात केली आहे. या उपक्रमातून शिरूर शहराचा सर्वांगीण विकास साधत, सर्व घटकांसाठी एक सुरक्षित, सुसज्ज, सुसंस्कृत आणि आधुनिक सुविधा असलेले मॉडेल शिरूर उभे करण्याचा संकल्प हाती घेण्यात आला आहे.



### ऐतिहासिकतेचा अभिमान आधुनिकतेचा स्वीकार

शहराच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचे जतन करत, आधुनिक नागरी सुविधांनी समृद्ध अशा शिरूरच्या नव्या रूपाची उभारणी करण्यासाठी आमदार कटके तसेच शिरूर नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे. प्रत्येक नागरिकाचा सहभाग ही या उपक्रमाची खरी ताकद असेल. नागरिकांच्या सहभागातून, तसेच सर्वेक्षणाच्या माध्यमातून एक मॉडेल शिरूर उभारण्याचे काम आता प्रत्यक्षात सुरू झाले आहे.

# पाथर्डी तालुक्यात वादळी वाऱ्याने थैमान

## कच्च्या घरांची पडझड, फळपिके व भाजीपाल्यांचे मोठे नुकसान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी तालुक्यात बुधवारी आलेल्या तुफानी वादळामुळे सुमारे तीसहून अधिक कच्च्या घरांची पडझड झाली असून, अनेक घरांचे पत्रे उडून गेले आहेत. अनेक ठिकाणी गोठेही उडून गेल्याने जनावरांचे मोठे नुकसान झाले आहे.

तसेच डाळिंब, आंबा, भाजीपाला यांसारख्या फळपिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आणि ग्रामस्थ हवालदिल झाले आहेत. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

भालगावसह पाथर्डी तालुक्यातील अनेक गावांमध्ये वादळाचा प्रचंड फटका बसला आहे. भालगाव येथील शेतकरी सुरेश खेडकर यांच्या डाळिंब बागेचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक आंब्याची झाडे मोडून पडली आहेत. या वादळामुळे शेतीचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. काही भागांतील फळबागा जमिनीपासून उमळून पडल्याचे वृत्त आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पाथर्डीचे तहसीलदार उद्धव नाईक यांनी तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले असून, प्रशासनाकडून नुकसानीचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

### शासनाने तात्काळ मदतीची घोषणा करावी

काल सायंकाळी पुन्हा एकदा जोरदार वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण अधिकच गडद झाले आहे. शेतकऱ्यांनी शासनाने तात्काळ मदतीची घोषणा करावी व नुकसान भरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

### संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा खंडित

शहरात अचानक तुफानी वादळी वारा सुरू झाला. त्यात पावसासह विजा चमकण्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. वादळ इतके प्रचंड होते की नागरिकांची एकच धावपळ उडाली. वीजेच्या तारांचे आणि पोलांचे मोठे नुकसान झाल्याने संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा खंडित झाला.




# कोठला येथील हॉटेलला मध्यरात्री भीषण आग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरातील कोठला, राज चेंबर्स परिसरात असलेल्या ओन्ली कुरेशी हॉटेलला बुधवारी (दि. ११ जून) रात्री अचानक भीषण आग लागली. हॉटेल बंद झाल्यानंतर रात्रीच्या सुमारास ही आग लागली. हॉटेलमधील काम आटोपून कर्मचारी स्टाफ रुममध्ये विश्रांती घेत असताना त्यांना हॉटेलमध्ये आग लागल्याचा फोन आला.

संदेश मिळताच कर्मचारी तात्काळ घटनास्थळी धावले व त्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी तातडीने अग्निशमन विभागाला संपर्क करून आग लागल्याची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे बंब तत्काळ घटनास्थळी दाखल झाले व त्यांच्या प्रयत्नांनी आग नियंत्रणात आणण्यात यश आले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी हॉटेलचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. हॉटेलमधील फर्निचर, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, किचन साहित्य आदी जळून खाक झाले. हॉटेलचे संचालक समीर कुरेशी यांनी आग कोणी लावली का? किंवा ती शॉर्टसर्किटमुळे लागली याचा अद्याप खुलासा झालेला नाही.

यासंदर्भात योग्य ती चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आम्ही प्रशासनाकडे केली असल्याची माहिती दिली. सध्या आग लागण्याचे कारण अस्पष्ट असून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे. या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती.



# किर्तन परंपरा सांस्कृतिक समृद्धीचे द्योतक : महंत रामगिरी महाराज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात किर्तन परंपरेचे स्थान अनन्यसाधारण आहे. ही परंपरा फक्त भक्तीपर नव्हे तर समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम ठरली आहे. किर्तनाची ही महान परंपरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृद्धीचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन येळेश्वर संस्थान येथील मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांनी केले.

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित टाळकरी वृंद सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता दलाचे प्रदेश सरचिटणीस भगवानराव बांगर होते.



प्रमुख पाहुणे म्हणून मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, उपाध्यक्ष ॲड. सुरेश आव्हाड, गायनाचार्य कांताबापू देवढे, अमोल महाराज सोळसे, रवी महाराज भापकर, तांदळे महाराज, आप्पासाहेब मोरे, राधाकिसन सबलस, प्राचार्य डॉ. बबन चौरे, शरद मेढे, मोहन देवढे, सुडके महाराज आदी उपस्थित होते.

पाथर्डी शहर, हंडाळवाडी, तनपुरवाडी व परिसरातील एकूण ७५ टाळकरी वृंदांचा सन्मान विठ्ठल-रुक्मिणीच्या आकर्षक मूर्ती देऊन करण्यात आला. यावेळी अमोल महाराज सोळसे, कांताबापू देवढे, राजेंद्र देवढे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बबन चौरे, सूत्रसंचालन डॉ. अभिमन्यू ढोरमारे व प्रा. शेखर ससाने यांनी तर आभार डॉ. अशोक कानडे यांनी मानले.

> वारकरी संप्रदायात तेराव्या शतकात सुरू झालेली किर्तन परंपरा आजही अखंड सुरू आहे. किर्तनकार व टाळकरी यांच्या समन्वयातूनच भक्तीचा गजर घरोघरी पोहोचतो. टाळकरी हा किर्तनाचा आत्मा असून त्यांचा सन्मान करणे हे खऱ्या अर्थाने परंपरेचा गौरव करणे आहे. **– महंत रामगिरी महाराज**

# व्यावसायिक प्रशिक्षणाबरोबर आर्थिक साक्षरता गरजेची

## विकास जाधव; प्रशिक्षकांची क्षमता बांधणी कार्यशाळा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महिलांसह युवक-युवतींना व्यावसायिक प्रशिक्षणाबरोबर आर्थिक साक्षरता गरजेची आहे. फक्त व्यवसाय करुन चालणार नाही, तर आलेल्या पैश्याचे योग्य नियोजन व गुंतवणूक उज्वल भविष्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. महिन्याला मिळणारे उत्पन्न, बचत, व्यवसायात गुंतवणूक आणि त्यातून मिळणारा लाभ यासंदर्भात विकास जाधव यांनी मार्गदर्शन केले.

भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय संचलित जनशिक्षण संस्थेच्या जिल्ह्यात विविध सेंटरमध्ये कार्यरत असलेल्या प्रशिक्षकांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या नगर शहरातील मुख्य कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात आर्थिक साक्षरता या विषयावर जाधव बोलत होते. याप्रसंगी जनशिक्षण संस्थेचे संचालक बाळासाहेब पवार, कमल पवार, शफाकत सय्यद, अनिल तांदळे आदी उपस्थित होते.

जाधव म्हणाले की, स्किल इंडिया मिशनची सुरुवात १५ जुलै २०१५ झाली. देशातील तरुण वर्गाला वेगवेगळ्या प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार उपलब्ध करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा त्याचा मुख्य उद्देश आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण ही योजना कौशल्य विकास उद्योग मंत्रालय यांच्यामार्फत राबवली जात आहे. या कार्यशाळेत आर्थिक नियोजन, पोर्टलला रजिस्ट्रेशन, डिजिटल मार्केटिंग, प्रशिक्षण केंद्रातील सुविधा, सायबर क्राईम पासून घ्यावयाची काळजी, ग्रामीण भागात असणाऱ्या अडचणी यासंदर्भात चर्चा करण्यात आली.

> जनशिक्षण संस्था सन २००५ पासून संस्थेचे संस्थापक डॉ. राधेश्याम गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली युवक व महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देत आहे. २० वर्षाच्या कार्यकाळात संस्थेने मोठा टप्पा गाठला असून, हजारो युवक-युवती आणि महिलांना त्यांच्या पायावर उभे करुन शून्यातून यशस्वी झालेल्यांच्या यशस्वी गाथा समाजासमोर उभा केल्या आहेत. **– बाळासाहेब पवार**



# नारायण महाराज जाधव आळंदी भूषण पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्याचे सुपुत्र व वारकरी, अध्यात्मिक क्षेत्रातील थोर विचारवंत, अभ्यासक, वेदांत सत्संग समितीचे संस्थापक हभप डॉ. नारायण महाराज जाधव यांना वारकरी संप्रदायातील मानाचा आळंदी भूषण पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

वारकरी संप्रदायातील थोर विभूती सद्‌गुरू मारुती बुवा गुरव यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा हा पुरस्कार श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील समस्त गुरव समाज आणि आळंदीकर यांच्या वतीने सद्‌गुरू मारुती बुवा यांच्या ८२ यांच्या पुण्यतिथी सोहळ्याचे औचित्य साधून दिला गेला.



या कार्यक्रमाला श्री क्षेत्र आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन, राहुल चितळकर, नंदकुमार कुऱ्हाडे, डी. डी. भोसले, राम गावडे, किरण येळवंडे, विलास वाघमारे, अनिल वाघमारे, ज्ञानेश्वर जाधव, संकेत वाघमारे, विश्वंभर पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते. संप्रदायातील त्यांच्या योगदानाचा विचार करूनच त्यांना अत्यंत मानाचा आळंदी भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. दरम्यान या कार्यक्रमाच्या निमित्ताने गेले ४ दिवस श्रीक्षेत्र आळंदी देवाची येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरात किर्तन-प्रवचनाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते.

### डॉ. जाधव ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक

आळंदी भूषण पुरस्कार प्राप्त डॉ. नारायण महाराज जाधव हे मूळचे पारनेर तालुक्यातील कर्जले येथील असून ते आपली वैद्यकिय क्षेत्रातील सेवा सोडून वारकरी संप्रदायाचा अभ्यास करण्यासाठी श्री क्षेत्र आळंदी देवाची येथे आले. संत एकनाथी भागवत विचार सागर ज्ञानेश्वरी वृत्ती प्रभाकर पंचदशी यावर त्यांचे अतिशय उत्कृष्ट प्रभुत्व असून ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांना डॉक्टर बाबा या नावाने ओळखले जाते.

# सौंदाळा, नागापुर रस्त्याचे काम गुणवत्तापूर्ण सुरु : गुंजाळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**हंडीनिमगाव** : पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून सौंदाळा ते नागापूर रस्त्याचे काम सुरू असून सदर रस्त्यावर काही ठिकाणी असलेले जमीन मालकांचे वाद, यामुळे रस्ता काम मार्गी लागण्यास अनेक अडचणी होत्या.

परंतु, यावर पंतप्रधान ग्रामसडक विभाग आहिल्यानगर, सौंदाळा, नागापूर गावचे सरपंच, गावातील नागरिक यांनी मध्यस्थी करून वाद असलेल्या शेतकऱ्यांला व्यवस्थित समाजावून सांगून सदर शेतकऱ्यांचे वाद मिटवून सदर काम मार्गी लावून प्रत्यक्ष कामास सुरुवात केली. परंतु सदर शेतकरी सदर कामात पुन्हा अडथळे आनण्याचे व काम बंद करून शासकीय यंत्रनेला वेठीस धरण्याचा प्रयत्न करत आहे.काम अंदाजपत्रक नुसार सुरू असून कामाची गुणवत्ता वेळोवेळी तपासण्यात येत असून काम करण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांनी सहकार्य केले. तर कामवेळेत पूर्ण करून घेता येईल, असे शेखर गुंजाळ अभियंता प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अहिल्यानगर यांनी सांगितले आहे.



# ... तर जशास तसे उत्तर दिले जाईल : आ. पडळकर

## पाथर्डी शहरातील अजंठा चौकात जनआक्रोश मेळावा; कर्डिले, जगताप, बेग यांची हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : राज्यात कुठेही गायीची हत्या झाली, तर त्याला सरकारच्या माध्यमातून जशास तसे उत्तर दिले जाईल, असा स्पष्ट इशारा भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिला आहे.

कायद्याचं, संविधानाचं, माणुसकीचं भान ठेवून जर कुणी केवळ पैशासाठी आमच्या धर्माला बदनाम करण्याचा प्रयत्न करत असेल, तर अशा षडयंत्रांना आम्ही योग्य तो प्रतिउत्तर देऊ, असेही ते म्हणाले. काहीजण हेतुपुरस्सर मस्तवालपणा करत असून त्यांना आवर घालणं गरजेचं झालं आहे, असे मतही पडळकर यांनी व्यक्त केले.

पाथर्डी येथे लव जिहादाचे वाढते बळी, गोरक्षक भारत लिपारे यांच्यावर प्राणघातक हल्ला, शहरात गोमांस विक्री आणि अवैद्य कत्तलखाने खुलेआम पोलिसांकडून सातत्याने दुर्लक्ष, हिंदूंच्या भावना आणि कायद्याची थट्टा, तिसगाव येथे राज रोज चालू असलेला कत्तलखाना यांच्या विरोधात भव्य जनआक्रोश मेळावा पाथर्डी शहरातील अजंठा चौकात घेण्यात आला.

या घटनेचा निषेध म्हणून पाथर्डी शहर बंद ठेवण्यात आले होते. प्रसंगी तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, आळंदीचे संग्राम महाराज भंडारे, आमदार संग्राम जगताप, शिवाजी कर्डिले, मोनिका राजळे, राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग, डॉ. मृत्युंजय गर्जे, अशोक चोरमले, दिगंबर भवार, धनंजय बडे, ॲड. प्रतीक खेडकर, रमेश हंडाळ, अमोल गर्जे, संजय मरकड, बजरंग घोडके, दीपक महाराज काळे व हिंदुत्ववादी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

आ. पडळकर म्हणाले, आपण हिंदू आहोत आणि हिंदू समाजासाठी काम करणे ही प्रत्येक पक्षातील कार्यकर्त्यांची भूमिका असली पाहिजे, असे स्पष्ट मत आ. पडळकर यांनी व्यक्त केले. गोहत्तेवर कायदा असतानाही कत्तलखाने कसे चालतात, असा सवालही त्यांनी पोलिस प्रशासनाला केला. प्रास्ताविक मुकुंद गर्जे तर आभार अमोल गर्जे यांनी मानले.

> भविष्यात गोरक्षकाची तक्रार आल्यास अधिकाऱ्यांनी ती गांभीर्याने घ्यावी. अन गोरक्षकावर जर कोणी खोटा गुन्हा दाखल केला तर आम्ही खपवून घेणार नाही. ठराविक समाजाचे लोक मावा,गुठखा विक्री करत कत्तलखाने चालवून इतरांना त्रास देत असून अशांना कडक शासन झाले पाहिजे. आमच्याकडे कोणी वाकड्या नजरेने पाहू नये. शेवगाव शहरात सुद्धा मागे काय घडले आहे, हे सर्वांना माहित आहे. मुलींना पळवले जाते, धर्मांतर केले जाते हे चुकीचे असून येथून पुढे कोणी वाकड्या नजरेने पाहत असेल तर हिंदू समर्थ आहे. तालुक्यात जे कत्तलखाने आहेत, ते जेसीबी ने उखडून टाका. **– मोनिका राजळे, आमदार**

> लव जिहादच्या बाबतीत आपल्या मुलींवर पालकांनी लक्ष ठेवण्याची गरज आहे. विशेषता परगावच्या मुली शिकणाऱ्यांवर जिहादी वृत्ती त्यांना लव जिहादच्या जाळ्यात अडकत आहे. गोरक्षणासाठी कार्यरत असलेल्या गोसेवकावर कत्तलखान्यांशी संबंधित जिहादी वृत्तीच्या लोकांकडून सातत्याने हल्ले होत आहेत. तथाकथित भाईचारा दाखवणाऱ्यांचे हे नाटक असून त्यामागे फक्त ढोंग आहे हे संकुचित राजकारण आहे. **– संग्राम जगताप, आमदार**



# मक्याच्या व्यवहारात शेतकऱ्याची १३ लाखांची फसवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** रूईछत्तीशी (ता. अहिल्यानगर) येथील शेतकऱ्याची विमाननगर, पुणे येथील व्यापाऱ्याने १३ लाख ५७ हजार ८८५ रूपयांची फसवणुक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी बुधवारी (११ जून) अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

रामकृष्ण नामदेव दरंदले (वय ४७) असे फसवणुक झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून त्यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. सुरेश प्रसाद नामक व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ जानेवारी २०२४ रोजी रात्री ८ वाजता ते ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९.४७ च्या दरम्यान, रूईछत्तीशी येथील शिवारामध्ये मका विक्रीचा व्यवहार करण्यात आला होता. फिर्यादी दरंदले यांनी एकूण ३० लाख ५७ हजार ८८५ रूपयांची मका सुरेश प्रसाद याला विकला. सुरूवातीला सुरेश प्रसाद याने १७ लाख रूपये अदा करून विश्वास संपादन केला. मात्र, उर्वरित १३ लाख ५७ हजार ८८५ रूपयांची मागणी दरंदले

यांनी वारंवार फोनवरून केली असताना, सुरेश प्रसाद याने टाळाटाळ करत उडवाउडवीची उत्तरे दिली आणि रक्कम दिली नाही.

दरम्यान, सुरेश प्रसाद हा उर्वरित पैसे देत नसल्याचे दरंदले यांच्या लक्ष्यात आल्यानंतर त्यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीची चौकशी झाल्यानंतर यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक रमेश गांगर्डे करीत आहेत.

# वृक्ष लागवड मोहीम लोकचळवळ म्हणून राबवा

## जिल्हाधिकारी डॉ.आशिया; वृक्ष लागवडीचे नियोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अहिल्यानगर :** राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत चालू वर्षात राज्यात १० कोटी वृक्ष लागवड मोहीम राबविण्याच्या शासनाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहिमेचे सूक्ष्म नियोजन करत ही मोहीम लोकचळवळ म्हणून राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात वृक्ष लागवडी संदर्भात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, विभागीय वन अधिकारी, सचिन कंद, पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, डॉ. एस.के.बांगर, जयहिंद फाऊंडेशनचे शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, राष्ट्रीय वन नितीप्रमाणे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वन आणि वृक्षाच्छादन असणे आवश्यक आहे. जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतूबदल याची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड हाती घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या वृक्ष लागवडीमध्ये जिल्ह्याचा सहभाग अधिक प्रमाणात रहावा, यादृष्टीने वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात यावे.

जिल्ह्यात शाळांच्या आवारामध्ये उपलब्ध जागेनुसार वृक्ष लागवड करावी. पाण्याच्या उपलब्धतेनुसार मियावाकीसारखे प्रयोग अंमलात आणावेत. बांधावर वृक्षे



लावण्याबरोबरच तुतीची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात यावी. वृक्ष लागवडीच्या कामांमध्ये शहरी भागांमध्ये माजी सैनिकांचा सहभाग घेण्याबरोबरच एनजीओ, विविध सामाजिक संघटना तसेच सर्वसामान्यांनाही या उपक्रमामध्ये सहभागी करुन घेण्यात यावे. वृक्षांची केवळ लागवड न करता वृक्षांच्या संगोपन होण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्यात यावे. सामाजिक वनीकरण विभाग तसेच इतर नर्सरीमधून रोपे उपलब्धतेचे नियोजन करावे. वृक्ष लागवडीचे जिओटॅग छायाचित्र काढून ते वनविभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

उपवनसंरक्षक सालविठ्ठल म्हणाले, शासनामार्फत दरवर्षी ही मोहिम आयोजित करण्यात येणार आहे. वृक्ष लागवडीसाठी प्रत्येक विभागाने लागवडीचे क्षेत्र व रोपाचे नियोजन करावे. पावसाळा सुरु झाला असून वृक्षांची लागवड तातडीने करण्याची गरज आहे. वृक्ष लागवडीसदंर्भात तांत्रिक मदतीसाठी वनीकरण विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# रेल्वे स्थानकावर पाच गाड्यांना थांबा द्यावा

## खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना दिले निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव रेल्वे स्थानकावर अवलंबून असलेली सोय, सध्या काही महत्त्वाच्या गाड्यांचे थांबे नसल्यामुळे खंडित झाली आहे. तेव्हा कोपरगाव येथील नागरिकांना व साई भक्तांना परिणामी, मनमाड, बेलापूर किंवा पुणे यासारख्या इतर स्थानकांवर प्रवासासाठी जावे लागत आहे. ही गैरसोय लक्षात घेता या स्थानकावर पाच महत्वाच्या गाड्यांना थांबा देण्यात येण्याची मागणी करण्यात आली आहे.

कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष सुधीर डागा यांच्या हस्ते शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना कोपरगाव रेल्वे स्थानकावर लांबपल्ल्याच्या पाच महत्त्वाच्या गाड्यांना थांबा द्यावा, यासाठी याबाबत लेखी स्वरूपात पत्र देण्यात आले.



सदरची मागणी ही व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष व कोपरगाव तालुका रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य सुधीर एस. डागा यांनी स्थानक प्रमुख भैरव प्रसाद यांच्याकडे देखील निवेदनाची प्रत देण्यात आली. सदर निवेदनाच्या प्रती कोपरगाव तालुक्याचे आमदार आशुतोष काळे आणि रेल्वे विभाग प्रमुख व अधिकारी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. सदर निवेदनात नमूद केल्या प्रमाणे कोपरगाव हे शहर सामाजिक, धार्मिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून झपाट्याने विकसित होत आहे. शिर्डीपासून अवघ्या १५ किमी अंतरावर असल्यामुळे साईभक्तांची मोठी गर्दी वर्षभर असते. त्या अनुषंगाने कोपरगाव औद्योगिकदृष्ट्याही विकसित होत असून, अनेक शेतकरी, व्यापारी व व्यावसायिक दररोज रेल्वेने प्रवास करत आहेत. तर विद्यार्थ्यांसाठी हे स्थानक अत्यंत महत्त्वाचे आहे.

### या गाड्यांना थांबा देण्यात यावा

काकीनाडा एक्सप्रेस,सिकंदराबाद एक्सप्रेस, विजयवाडा एक्सप्रेस,काम ायनी एक्सप्रेस,पाटलीपुत्र एक्सप्रेस या गाड्यांचे थांबे कोपरगावसारख्या महत्त्वाच्या स्थानकावर नसणे ही दुर्दैवाची बाब असून, थांबा दिल्यास नागरिकांची प्रवास सुविधा अधिक सुकर होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# मेघना ब्राम्हणे यांचे परीक्षेत यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या लोणी येथील प्रवरा स्पर्धा परीक्षा केंद्रातील मेघना संतोष ब्राम्हणे यांची शासनाच्या आरोग्य विभागात औषध निर्माण अधिकारी म्हणून निवड झाली आहे. अशी माहीती संस्थेचे शिक्षण संचालक डॉ.प्रदिप दिघे यांनी दिली.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शासकीय आणि निम शासकीय सेवेत संधी मिळाव्यात, या उद्देशाने संस्थेने प्रवरा परिसरातील विद्यार्थ्यांसाठी प्रवरा स्पर्धा परीक्षा केंद्र आणि प्रवरा अभ्यासिका सुरू केल्या आहेत. स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना तज्ञ मार्गदर्शक आणि विविध सेवा सुविधा या केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातात. मोफत संदर्भ पुस्तकांची सुविधा मुलाखतीचे तंत्र या विषयावरती सविस्तर माहिती तज्ञाच्या माध्यम ातून या केंद्रातून दिली जाते.

संस्थेच्या माध्यमातून विविध महाविद्यालयामध्ये प्रवरा स्पर्धा परीक्षा केंद्र आणि पोलिस भरती केंद्र कार्यरत आहे. यांचा ग्रामीण विद्यार्थ्यांना चांगला फायदा होत आहे. आजपर्यंत या केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विविध विद्यार्थी हे शासकीय आणि निम शासकीय सेवेमध्ये रुजू झाल्याचे समन्वयक डॉ. शैलेश कवडे- देशमुख यांनी सांगितले.

# दुचाकी संवर्गातील नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरिता नवीन वाहन क्रम ांक मालिका सुरू करण्यात येत असून इच्छुक अर्जदारांनी १६ व १७ जून रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या विहित शुल्काच्या धनादेशासह अर्ज रोखपाल विभागाच्या खिडकी क्रमांक १४ वर जमा करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

अर्ज सादर करताना वाहन मालकाच्या नावाचा अर्ज असावा. अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, पॅनकार्ड, आधारकार्ड व त्यास संलग्न भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांकाचा धनादेश अहिल्यानगर कँप शाखा / ट्रेझरी शाखा यांच्यासाठी देय असावा.

एका पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज प्राप्त झाल्यास त्याचा विचार केला जाईल. परंतु, एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास अशा अर्जांची यादी १७ जून रोजी सायंकाळी ४.३० वाजता कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध केली जाईल.

ज्या पसंती क्रमांकासाठी एकाहून अधिक अर्ज आलेले असतील, त्यांच्यासाठी अर्जदारांनी १८ जून रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांक शुल्काच्या धनादेशाव्यतिरिक्त जादा रकमेचा धनादेश बंद लिफाफ्यात सिलबंद स्वरूपात खिडकी क्रमांक १४ वर सादर करावा. त्यानंतर हे अर्जदार १८ जून रोजी दुपारी ३ वाजता सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या दालनात उपस्थित राहावेत.

लिलावासाठी अर्जदार किंवा त्यांचा प्रतिनिधी ओळखपत्र व प्राधिकारपत्रासह उपस्थित राहणे आवश्यक आहे. ज्या अर्जदाराने सर्वाधिक रकमेचा धनादेश सादर केला असेल, त्याला संबंधित पसंती क्रमांक देण्यात येईल. उर्वरित अर्जदारांचे धनादेश त्यांना परत करण्यात येतील.

# अवैध धंद्याचे चौधरींसमोर आव्हान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड तालुक्यात राजरोसपणे पणे अवैद्य धंदे जोरात सुरू आहेत. मागील आठवड्यात काही बातम्या प्रसिद्ध होताच मटक्याच्या टपऱ्या दोन दिवस बंद ठेवण्याचा दिखावा करण्यात आला. मात्र दोन दिवस बंद झालेल्या मटका टपऱ्या पुन्हा जोराने सुरू झाल्या आहेत. तसेच अवैद्य धंदे कलाकेंद्राचे काटेकोर नियम व गुन्हेगारीवर वचक ठेवण्याचे आवाहन सध्या नवीन पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या समोर एक आव्हानच आहे.

जामखेड पोलीस स्टेशनला पुर्वी असलेले पोलीस निरीक्षक महेश पाटील यांची बदली झाली. त्यामुळे त्यांच्या जागेवर नवीन पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार घेतला आहे. सध्या मात्र जामखेडमध्ये सुरू असलेल्या अवैध धंद्याचे पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या समोर मोठे आव्हान आहे. कारण सध्या जामखेड तालुक्यात राजरोसपणे अवैद्य धंदे जोरात सुरू आहेत.

मागील आठवड्यात अवैध धंद्याविरोधात काही बातम्या प्रसिद्ध होताच पोलीस प्रशासनाने थातुर मातुर कारवाई केली होती.




पण पुन्हा प्रशासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखविली आहे.


जामखेड शहरातील बाजार, तपनेश्वर गल्लीसह अनेक ठिकाणी मटक्याची दुकाने सुरू आहेत. शहरातील कलाकेंद्रावर देखील नियम धाब्यावर बसवत कलेऐवजी त्या ठिकाणी डीजे लावुन डान्स सुरू आहे. तसेच कलाकेंद्र हे नियम धाब्यावर बसवून रात्रभर चालवण्यात येतात. त्यांच्या नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी प्रयत्न केले पाहिजेत.

# देहरे शिवारात दोन गटातील वादातून हाणामारी व दगडफेक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** तालुक्यातील देहरे परिसरात दोन गटांत वाद होऊन हाणाम ारीची घटना घडली. यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. एका बाजूला पांढरी वस्ती येथे लोखंडी गजाने पुरूष व महिलांना मारहाण करण्यात आली, तर दुसऱ्या घटनेत हॉटेलवर दगडफेक व धम की दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

पांढरी वस्ती, देहरे येथे दुपारी तीन वाजेच्या सुमारास गोरख गजाबापू करांडे (वय ४०, व्यवसाय शेती) यांना चौघांनी मारहाण केली. गोरख यांच्या पत्नी आणि आईने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही लोखंडी गजाने मारहाण करण्यात आली. या प्रकरणी गोरख यांच्या फिर्यादीवरून दादा दामोदर करंडे, सुर्यभान दादा करंडे, रोहन बाळासाहेब करंडे आणि किरण बाळासाहेब करंडे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.



याच दिवशी, देहरे गावाजवळील क्वालिटी बिर्याणी हाऊस या हॉटेलमध्ये दुपारच्या सुमारास झालेल्या दुसऱ्या घटनेने वातावरण अधिकच चिघळले. या प्रकरणी सुर्यभान दादा करंडे (वय ४७) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, गोरख करांडे हा मद्यधुंद अवस्थेत हॉटेलमध्ये घुसला व दगडफेक करत गोंधळ घालू लागला. त्याच्या सोबत त्याची पत्नी संगिता करंडे व आई परिगाबाई करंडे होत्या. तिघांनीही शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पोलिसांनी गोरख करंडे, संगीता करंडे व परीगाबाई करंडे विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# महावितरण अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासणार

## सर्व पक्षीय नेत्यांचा इशारा; अधिकारी झाले परागंदा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यात व शहरात गेली २४ तासापासून लाईट गेल्यामुळे महावितरणच्या विरोधात सर्वसामान्य लोकांच्या भावना तीव्र झाल्या असून सर्वपक्षीय नेत्यांनी महावितरण कार्यालय येथे निदर्शने करून महावितरणचे कार्यकारी अभियंता अजय भंगाळे यांच्या खुर्चीला हार घालून गांधीगिरी करून इथून पुढे लाईट गेल्यास महावितरण च्या अधिकाऱ्यास कुठलीही पूर्व सूचना न देता तोंडाला काळे फासण्यात येईल, असा इशारा सर्वपक्षीय नेत्यांनी दिला.

महावितरणचे सहाय्यक अभियंता अक्षय विखे यांना रिपाइंचे सुभाष त्रिभुवन, मुळा प्रवराचे संचालक सिद्धार्थ मुरकुटे, मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष गौतम उपाध्ये, शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे संजय छल्लारे, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे जीवन सुरूडे, राष्ट्रवादीचे जिल्हा संघटक शोहेल दारूवाला, आम आदमी पार्टीचे तिलक डूगरवाल यांच्या हस्ते मागण्याचे निवेदन देण्यात आले. त्यावेळी महावितरणाच्या विरोधात तीव्र घोषणा देण्यात आल्या.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेली दहा दिवसात दोन वेळेस २४ तास लाईट गेल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यात पिण्याचे पाणी वापरण्याचे पाणी तसेच वैद्यकीय सेवेत देखील अर्थाळा निर्माण झाला आहे. लाईट कधी येईल वायरमन सांगत नाही, अधिकारी फोन उचलत नाही, त्यामुळे नागरिकाला मोठा मनस्ताप सहन करावा लागतो.

लाईट त्याची माहिती वेळोवेळी देण्यासाठी महावितरणने ती सुविधा त्वरित उपलब्ध करून लोकांना लाईट संदर्भात माहिती देण्यात यावी कारण सर्वसामान्य जनतेच्या भावना महावितरणाच्या विरोधात तीव्र झाल्या असून महावितरण कडून त्वरित सुधारणा करून घेण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली.






# 'किंग' चा नवा अवतार



चित्रसृष्टीत अनेक नव्या-जुन्या कलाकारांची रेलचेल असली तरी किंगचे स्थान अबाधित आहे, यात शंका नाही. लवकरच दिग्दर्शक सिद्धांत आनंद यांच्या बहुप्रतिक्षित 'किंग' मध्ये चित्रसृष्टीतील किंग शाहरुख खान दिसणार आहे. या ॲक्शन थ्रिलरमध्ये शाहरुखकन्या सुहाना देखील असल्याने प्रेक्षकांमध्ये कुतूहल वाढले आहे.

कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी यातील कलाकार आणि इतर गोष्टींबाबत काही अपडेट्स आता समोर आले आहेत. त्याचबरोबर नुकताच शाहरुख खानचा नवीन लूकही व्हायरल झाला असून तो त्याचा 'किंग'साठीचा लूक असल्याचा चाहत्याचा समज आहे. दुसरे म्हणजे सध्या या बॉलिवूड सुपरस्टारचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत असून यात त्याचे बायसेप्स स्पष्ट दिसत आहेत. हातावर टॅटू काढल्याचे समजत आहे.

इंटरनेटवर व्हायरल होणाऱ्या या व्हिडिओमध्ये शाहरुख 'बिली हिल' टँक टॉप आणि बीनी घातलेला दिसतो. अभिनेत्याचा हा रफ लूक चाहत्यांच्या पसंतीस उतरत आहे. व्हिडिओमध्ये अभिनेता लिफ्टमधून उतरून गाडीकडे चालत जाताना दिसतो. इमारतीतील कर्मचारी आणि वाटेत उपस्थित असणाऱ्या सर्वांनीच त्याचे स्वागत केलेले पाहायला मिळते.

चाहत्यांना आठवत असेल की, एप्रिलपूर्वी शाहरुख खान कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात दिसला नव्हता. नंतर 'मेट गाला' लूक मध्ये राजाच्या अवतारात रेड कार्पेटवर आला आणि त्याने एकच खळबळ उडवून दिली. तथापि हा लूक, स्क्रिप्ट आणि राजाशी संबंधित इतर घडामोडी पूर्णपणे गुप्त ठेवण्यात आल्या आहेत. दुसरीकडे, त्याचा लूक पाहून चाहते पुढील पात्राबद्दल अंदाज लावू लागले आहेत. एका वापरकर्त्याने त्याचे पात्र ९० च्या दशकातील गँगस्टरपासून प्रेरित असण्याची शक्यता व्यक्त केली आहे तर दुसऱ्याने 'किंग' शूटसाठी टॅटू लूक... असे म्हणत प्रतिक्रिया नोंदवली आहे. किंगबरोबर आगामी 'किंग'मध्ये अभिषेक बच्चन, दीपिका पदुकोण, राणी मुखर्जी, अनिल कपूर आणि अभय वर्मा या सारखे कलाकार मुख्य भूमिकेत असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# लहान वय, मोठी झेप



शान्य भारतातल्या एका छोट्या गावातील अवघ्या नऊ वर्षांच्या बिनिता छेत्रीने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उंचावले आहे. आसाममधील कार्बी आंगलोंग जिल्ह्यातील रहिवासी बिनिताने 'ब्रिटेन्स गॉट टॅलेंट २०२५' या प्रसिद्ध रिॲलिटी शोमध्ये दुसरी उपविजेती बनून इतिहास रचला आणि देशवासियांची मान अभिमानाने ताठ झाली.

बिनिता आसाममधील तलबलीजान गावाची रहिवासी आहे. तिने अगदी लहान वयात दाखवलेली नृत्य प्रतिभा केवळ परिक्षकांसाठीच नाही तर जगभरातील प्रेक्षकांसाठीही प्रेरणादायी ठरली. आपल्या सादरीकरणात तिने पारंपरिक भारतीय नृत्य आणि आधुनिक नृत्यशैलीचे असे मिश्रण सादर केले की लोक कौतुक करताना थकत नव्हते.

ब्रिटिश जादूगार हॅरी मोल्डिंगने ब्रिटनच्या 'गॉट टॅलेंट २०२५' च्या अंतिम फेरीत पहिला क्रमांक पटकावला तर 'द ब्लॅकआउट्स' नृत्य गट दुसऱ्या क्रमांकावर राहिला. या दोन्ही सहभागींमध्ये जोरदार स्पर्धा झाली. बिनिताने अद्वितीय कला आणि आत्मविश्वासाने तिसरे स्थान मिळवले. कोणत्याही भारतीयासाठी ही अभिमानाची गोष्ट म्हणावी लागेल.

मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी या कामगिरीबद्दल बिनिताचे अभिनंदन केले आणि सांगितले की, तिने भारत आणि आसामचे नाव उंचावले आहे. बिनिताने व्हिडिओद्वारे सर्व समर्थकांचे आभार मानले. या उत्तुंग कामगिरीबद्दल बिनिताला कार्बी आंगलोंग कौन्सिलचे प्रमुख तुलीराम रोंगहांग यांच्याकडून पाच लाख रुपये दिले गेले. याबद्दलही या चिमुरडीने त्यांचे आभार मानले. त्याचबरोबर आसाम विधानसभेचे उपाध्यक्ष नुमुल मोमीन यांचे आभार मानण्यास ती विसरली नाही.

# गाजतीये कॅमेऱ्या बाहेरची जोडी



हॉलिवूड सुपरस्टार जॅकी चॅनने बहुचर्चित ॲक्शन थ्रिलर चित्रपट 'कराटे किड लेजेंड्स'द्वारे जगभरातील चित्रपटगृहांमध्ये दमदार पुनरागमन केले आहे. त्याच्या या चित्रपटाचे बॉलीवूड सुपरस्टार अजय देवगण आणि त्याचा मुलगा युग देवगण या दोघांनी हिंदी भाषेत डबिंग केले आहे. सध्या पिता-पुत्राच्या या चित्रपटाचा देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ बघायला मिळत आहे. 'कराटे किड लेजेंड्स'ने रविवारी गली कमाई करत जॅकीची जादू होती तशीच असल्याचे दाखवून दिले. व्हा भारतीय प्रेक्षक चित्रपट चांगलाच गाजवताना दिसत आहे. ३० मे रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झालेला हा चित्रपट २०१० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'द कराटे किड'चा सिक्वेल आहे. चित्रपटाबद्दल चाहत्यांमध्ये आधीपासूनच मोठी क्रेझ होती. त्यातच अजय देवगण आणि युग देवगण कॅमेऱ्याबाहेर असले तरी या चित्रपटाचा एक भाग असल्याची माहिती समोर आली तेव्हा तर चर्चा चांगलीच रंगली. 'कराटे किड लेजेंड्स'ने रविवारी सुमारे २.१३ कोटी कमाई केली. अर्थात शनिवारपेक्षा ती थोडी कमी आहे. परंतु हॉलिवूड चित्रपटांची आकडेवारी बघता ही स्थिती निश्चितच वाईट मानली जाऊ शकत नाहीत.अशाप्रकारे त्याची आत्तापर्यंतची कमाई ६.१२ कोटीच्या पुढे पोहोचली आहे.



# राधिका का रागावली?

राधिका आपटे हे वेगवेगळ्या कारणांमुळे सतत चर्चेत असणारे नाव आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये तिने बाळाला जन्म दिला. तेव्हापासून राधिका आई असण्याच्या जबाबदाऱ्या आणि तर दुसरीकडे व्यावसायिक कामाचा समतोल साधत आहे. या अभिनेत्रीने गरोदरपणाची घोषणा केली नव्हती. त्याचमुळेच बीएफआय लंडन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'सिस्टर मिडनाईट' याच्या स्क्रीनिंगमध्ये बेबी बंपसह ती दिसली तेव्हा सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला. यथावकाश राधिकाने गोंडस बाळाला जन्म दिला आणि काही दिवसांनी एक फोटो शेअर करत तिने बाळाला स्तनपान देत असतानाच लॅपटॉपवर काम सुरू असल्याचे दाखवून दिले.

बाळाला जन्म दिल्यानंतर अवघ्या एका आठवड्यात ती कामावर परतली. परंतु हे क्षेत्र नवमातांना मदत करणारे नाही, असे म्हणत तिने आता चर्चेची राळ उडवून दिली आहे. अर्थात तिच्या या वक्तव्यावर इंडस्ट्रीतील काहींनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. भारतीय चित्रपट उद्योग तिच्यासारख्या महिलांना आधार देण्यासाठी उभा केलेला नाही, असे म्हणत काहींनी तिला फटकारले तर दुसरीकडे राधिका नवीन मातांना येणाऱ्या आव्हानांबद्दल सातत्याने बोलताना दिसत आहे. एकंदरच सध्या मनोरंजन उद्योगात मातृत्वाबद्दलची चर्चा जोर धरत आहे. नुकतेच दीपिका पदुकोणने संदीप रेड्डी वांगाचा 'स्पिरीट' सोडल्याची बातमी आली. दीपिकादेखील मातृत्वानंतर कामावर परतत होती. परंतु, आई असल्याने तिने कामाच्या वेळेत काही बदल करण्याची मागणी केली जी अर्थातच नाकारली गेली. यानंतर तिने चित्रपट सोडला. दुसरीकडे अभिनेत्रीच्या वाढत्या मागण्यांमुळे तिला कामावरून काढून टाकल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, अभिनेता-निर्माता अजय देवगणने ट्रेलर लाँचच्या वेळी दावा केला की, आठ तासांचा कामाचा दिवस केवळ मातांसाठीच नाही तर सामान्य लोकांसाठीही असायला हवा. या सगळ्यामुळे अन्य क्षेत्रांबरोबर आता मनोरंजनविश्वातही कामाच्या वेळेवरुन चर्चा कानी येत आहे. नव्या मातांसाठी आपल्या चित्रपट उद्योगात काम करणे खरोखर कठीण आहे, असे राधिका यावर प्रतिक्रिया देताना म्हणते. कामाच्या लांबणाऱ्या वेळेमुळे आपल्याला बाळाला पाहण्याची संधी मिळत नसल्याची खंत ती बोलून दाखवते. राधिकाने संपूर्ण गर्भधारणेदरम्यान काम केले. प्रसूतीच्या आदल्या दिवसापर्यंत ती कार्यरत राहिली आणि प्रसूतीनंतर एका आठवड्याच्या आत व्हर्च्युअल मीटिंगसाठी झूम कॉलवर परत आली. तिचा 'सिस्टर मिडनाईट' अलिकडेच प्रदर्शित झाला. आता या चर्चेचा त्याच्या प्रसिद्धीवर कसा परिणाम होतो, ते लवकरच दिसेल.

# सत्काराने मामा सुखावले




मराठी सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते आणि हास्यसम्राट अशोक सराफ यांना नुकताच दिला गेलेला पद्मश्री पुरस्कार प्रत्येक मराठी मनाला सुखावणारा आहे. कला, सामाजिक कार्य आणि संगीत क्षेत्रातील योगदानासाठी ६८ प्रतिष्ठित व्यक्तींना पुरस्कारांच्या दुसऱ्या टप्प्यात सन्मानित करण्यात आले. यामध्ये अशोक सराफ यांचा समावेश होता. पद्म पुरस्कार देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक आहे. पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री या तीन श्रेणींमधील एक असणाऱ्या या पुरस्काराने अशोक सराफ या अवलियाचा उचित सन्मान झाल्याची भावना रसिकांकडून व्यक्त होत आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर अशोक सराफ यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत सगळ्यांचे आभार मानले. 'पद्मश्री हा सन्मान माझ्या जीवनातील एक विशेष क्षण आहे. त्यासाठी मी शासनाचे आभार मानतो. तसेच कुटुंबीयांचे, सहकलाकारांचे आणि प्रेक्षकांचेही आभार. तुमच्या प्रेमाशिवाय हे शक्य झालं नसतं. तुमचा प्रेम आणि आशिर्वाद कायम असाच राहू द्या,' असं म्हणत त्यांनी आनंद व्यक्त केला. पुरस्कार स्वीकारण्याआधी अशोक सराफ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि सभागृहातील उपस्थितांचे हात जोडून अभिवादन केले. त्यांच्या या कृतीने सगळ्यांची मनं जिंकून घेतली. त्यांच्या हातात पुरस्कार देताना उपस्थित सर्वांच्याच चेहऱ्यावर हास्य होतं. सर्वांनी मनापासून त्यांचे अभिनंदन केले.

पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल अशोक सराफ म्हणाले की, 'ही खूप आनंदाची गोष्ट आहे. हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. हा एक मोठा सन्मान आहे. या पुरस्कारासाठी माझे नाव विचारात घेण्यात आले याचा आनंद आहे. याचा अर्थ मी आयुष्यात खरोखर काहीतरी केले आहे.'

अशोक सराफ यांना सर्वजण प्रेमाने 'मामा'अशी हाक मारतात. अशोक मामांचा जन्म १९४७ मध्ये मुंबईतच झाला. १९६९ पासून ते सिनेसृष्टीत कार्यरत आहेत. मराठीसोबतच त्यांनी अनेक हिंदी सिनेमांमध्येही काम केलं. 'जानकी' या सिनेमातून त्यांनी अभिनयात पदार्पण केलं, अशी खास ओळख निर्माण करणाऱ्या या लाडक्या अभिनेत्याला मानाचा मुजरा.

# आमिरचे पहिले प्रेम...!



आमिर खान कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाच्या चित्रपटांपैकी एक 'सितारे जमीन पर'ची तयारी करत आहे. याविषयीच्या बातम्या गेले काही दिवस चर्चेत आहेत. स्पॅनिश हिट चित्रपट 'चॅम्पियन्स' (२०१८) पासून प्रेरित होऊन तयार होणारा हा चित्रपट २० जून २०२५ रोजी प्रदर्शित होत असल्यामुळे चाहते उल्हसित आहेत. आधीच्या वृत्तानुसार हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होणार, असे समजले होते. त्यानंतर तो थेट यूट्यूबवर प्रदर्शित होईल असे सांगण्यात आले तसेच त्यासाठी पेपर-व्ह्यू मॉडेल स्वीकारण्यात आले असल्याचे कळले. अभिनेत्याच्या या निर्णयाने सगळेच आश्चर्यचकित झाले होते. तथापि, आता आमिर खानने त्या सर्व अफवांना पूर्णविराम दिला आहे.

अशा वृत्तांवर प्रतिक्रिया देताना आमिरने 'सितारे जमीन पर' २० जून २०२५ रोजी फक्त थिएटरमध्ये प्रदर्शित होईल असे स्पष्ट केले असून इतर चित्रपटांप्रमाणे लगेचच तो कोणत्याही ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार नसल्याचे सांगितले आहे. एका पॉडकास्ट मुलाखतीत आमिर खान म्हणाला की, चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी वेगवेगळे प्रस्ताव आले असले तरी मी सर्वांना बाजूला ठेवत आहे आणि फक्त एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करत आहे आणि ती म्हणजे थिएटर.

तो पुढे म्हणाला, 'एक काळ असा होता की चित्रपट सहा महिन्यांनी ओटीटीवर यायचा. आता तो काही आठवड्यांमध्येच येतो. पण मला ते आवडत नाही. मला ओटीटीशी संबंधित कोणतीही समस्या नाही. मी ओटीटीसाठी कोणताही कंटेंट बनवला तर तो थेट ओटीटीवरच घेईन. पण 'सितारे जमीन पर' फक्त थिएटरमध्येच येईल. मी सिनेमा आणि थिएटरवर विश्वास ठेवणारा माणूस आहे. वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मकडे मी अतिशय आदराने पाहतो. पण त्यापेक्षा मोठ्या पडद्यावर माझे जास्त प्रेम आहे. खरे तर हेच माझे पहिले प्रेम आहे. अगदी थिएटर व्यवसाय बंद पडला तरच मी पुढे काय करायचे याचा विचार करेन...' आमिरचे हे वक्तव्य खूप काही सांगून जाणारे आहे.

# 'वीरा चंद्रहास' ओटीटीवर बघा

देशभरातील प्रेक्षकांना दाक्षिणात्य चित्रपट पहायला आवडतात. या प्रत्येक चित्रपटाची अनोखी कथा आणि थरार असतो, जो हिंदी चित्रपटांमध्ये कुठेही दिसत नाही. असाच एक थ्रिलर म्हणजे कन्नड भाषेतील पौराणिक चित्रपट 'वीरा चंद्रहास'. थिएटरमध्ये धुमाकूळ घालल्यानंतर आता तो ओटीटीवर दाखल झाला आहे.

उत्तम कथेने प्रेक्षकांची मने जिंकणारा 'वीरा चंद्रहास' नुकताच ऑनलाइन स्ट्रीम झाला आहे. तो एप्रिल महिन्यात मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झाला होता. 'केजीएफ' आणि 'सालार' सारखे अनेक ब्लॉकबस्टर चित्रपट बनवणाऱ्या 'होम्बाले फिल्म्स'च्या बॅनरखाली त्याची निर्मिती करण्यात आली होती. एका अनोख्या आणि मनोरंजक पौराणिक कथेच्या आधारे 'वीरा चंद्रहास'ने सर्वांना प्रभावित केले. स्वाभाविकच बॉक्स ऑफिसवर त्याने आपली छाप सोडली.

त्यानंतर नुकताच तो 'अमेझॉन प्राइम व्हिडिओ'वर ऑनलाइन स्ट्रीम करण्यात आला आहे. तथापि, त्याच्या ओटीटी रिलीजबद्दल फारशी चर्चा झाली नाही आणि निर्मात्यांनी त्याची घोषणाही केली नाही. अर्थात असे असले तरी तो ओटीटीवरही चित्रपटप्रेमींची मने जिंकताना दिसत आहे. प्राइम व्हिडिओवर हा चित्रपट 'अवश्य पहावा' अशा चित्रपटांच्या यादीत स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.




इंटरनेट मूव्ही डेटाबेस म्हणजेच आयएमडीबीकडून मिळालेल्या सकारात्मक रेटिंगवरून चित्रपटाची लोकप्रियता आणि त्यातील उत्तम आशय सहज मोजता येतो. 'वीरा चंद्रहास'ला आयएमडीबीकडून ८.२/१० चे उत्तम रेटिंग मिळाले आहे. यावरून मानले जाऊ शकते की, हा चित्रपट खरोखरच अवश्य पहावा असा आहे.

# अशी आहे नवी 'मिस वर्ल्ड'

थायलंडची २१ वर्षीय ओपल सुचाता चुआंगश्री ने मिस वर्ल्ड २०२५ चा किताब जिंकला आणि जगाचे लक्ष वेधून घेतले. हैदराबादमधील 'हायटेक्स एक्झिबिशन सेंटर'मध्ये १०८ देशांमधील स्पर्धकांमध्ये अलिकडेच ही स्पर्धा रंगली. भारताची नंदिनी गुप्ता उत्कृष्ट कामगिरीने टॉप-२० मध्ये पोहोचण्यात यशस्वी झाली. पण ती टॉप-८ मध्ये स्थान मिळवू शकली नाही. तथापि, तिने मिस वर्ल्ड २०२५ मध्ये 'टॉप मॉडेल'चा किताब जिंकून नाव राखले.

मिस वर्ल्ड २०२४ क्रिस्टीना पिस्झकोवाने ओपल सुचाताच्या मस्तकावर मुकुट घातला. मिस वर्ल्ड रनर-अप इथिओपियाची हासेट डेरेझ ठरली तर दुसरी रनर-अप पोलंडची माजा क्लाझदा आणि तिसरी रनर-अप मार्टिनिकची ऑरेली जोआकिम ठरली. मिस वर्ल्डचा किताब जिंकल्यानंतर ओपल सुचाता भावुक झालेली दिसली. 'हा माझा वैयक्तिक विजय नाही तर सगळ्या तरुण मुलींचा विजय आहे. ज्यांना पाहिले पाहिजे, ऐकले पाहिजे आणि बदल घडवून आणण्याची इच्छा आहे अशा सर्वांचा हा विजय असल्याचे भावुक मत तिने यावेळी नोंदवले. एका समृद्ध वारशाचे प्रतिनिधित्व करण्याचा आणि मिस वर्ल्डच्या या काळात खरा बदल घडवून आणण्याचा मला अभिमान असल्याचे सांगत तिने आनंद व्यक्त केला.

कोटा येथील रहिवासी नंदिनी गुप्ता हिने यावर्षी मिस वर्ल्ड २०२५ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. तिने टॉप मॉडेलचा किताब जिंकला आणि टॉप-४० मध्ये स्थान मिळवले. टॉप-८ मधून बाहेर पडली तरी ती टॉप-२० मध्ये स्थान मिळवण्यात मात्र ती यशस्वी झाली. मुख्य म्हणजे ती अंतिम फेरीच्या सांस्कृतिक समारंभात शो स्टॉपर होती.

यंदा बॉलिवूड अभिनेता सोनू सूदला सामाजिक कार्यासाठी 'मिस वर्ल्ड ह्युमॅनिटेरियन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजी मिस वर्ल्ड आणि बॉलिवूड अभिनेत्री मानुषी छिल्लर, दक्षिणेतील सुपरस्टार चिरंजीवी आणि विजय देवरकोंडा यासारखे अनेक सेलिब्रिटी अंतिम फेरीचा सहभागी होते. इशान खट्टर आणि जॅकलिन फर्नांडिस यांनीही अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी केली. या वर्षीच्या 'मिस वर्ल्ड'च्या ज्युरी सदस्यांमध्ये सोनू सूद देखील होता. सोनू सूदने मिस वर्ल्ड ओपल सुचाताला शेवटचा प्रश्न विचारला आणि चोख उत्तर देत तिने या स्पर्धेवर आपले नाव कोरले.

